## कुख्यात गुंड बापू नायरला राष्ट्रवादीचे तिकीट

**पुणे, दि. ३१ प्रतिनिधी**

पुणे शहराला गुन्हेगारीमुक्त करण्याचे आश्वासन देणारे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार सध्या आपल्या एका निर्णयामुळे वादाच्या भोऱ्यात सापडले आहेत. आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने चक्क कुख्यात गुंडांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मैदानात उतरवले आहे. अजित पवारांनी पुण्यात मात्र गुन्हेगारांना सढळ हाताने 'एबी फॉर्म' दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. पुण्यातील कुख्यात गुंड बापू उर्फ कुमार प्रभाकर नायर याला प्रभाग क्रमांक 39 मधून राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी जाहीर केली आहे. बापू नायरवर हत्या, हत्येचा प्रयत्न, खंडणी आणि मोक्का यांसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. तो काही काळापूर्वीच जामिनावर बाहेर आला असून, शिवसेनेचे माजी पदाधिकारी दीपक मारटकर यांच्या खून प्रकरणातही त्याचे नाव आहे. अशा व्यक्तीला उमेदवारी दिल्याने पोलीस आणि प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

www.dainikmahasagar.in Epaper: www.epaper.dainikmahasagar.in

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
५०६, यशवंत सृत टॉवर, स्मार्ट बाजारच्या मागे,
आदिनाथ अपार्टमेंट समोर,विरार प. मोबाईल नं. ९०११०५५४१३

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९४२०६९१४२०

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | गुरुवार, १ जानेवारी २०२६ | वर्ष: १ | अंक:२०९ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३




## नवे वर्ष शुभ फलदायी ठरो!




गतवर्षी १२ वाजून एक मिनिटांनी २०२५ची सुरुवात झाली. डिसेंबरचा शेवटचा क्षण आणि जानेवारी एकचा पहिला क्षण या दोघांच्या मिलनाला आपण नवीन वर्षाची सुरुवात म्हणतो. पाश्चात्य लोक नव्या दिवसाची सुरुवात रात्री बारा वाजता करतात, म्हणजे ते अंधाराकडून उजेडाकडे जातात आपण उजेडाकडून व्हाया अंधार ते पुन्हा उजेडाकडे येतो. अंधार म्हणजे काटेकुटे, खाचखळगे आणि ओबड धोबडपणाचा रस्ता अशी संकल्पना आहे. पण नव्या प्रभातीच्या आशेने आपण नवीन वर्षाचे स्वागत करतो. आपले नवीन वर्ष खरे म्हटलं तर गुढीपाडव्याला सुरू होते. गुढीपाडवा ते गुढीपाडवा संवत्सर म्हणजे आपले वर्ष आहे. बरं आपल्या वर्षात कधीकधी १३ महिनेही असतात ते जाऊ द्या. सध्या आपण तसेही ५०% इंग्रजाळलेलोच आहोत. मराठीच्या शाळा ओस पडत आहेत. आज-काल बहुतेक मुलांच्या आया आपल्या बाळाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करत आहेत. या भव्य भव्य इमारतींच्या शाळा पाहिल्यावर डोळे दिपून जातात. त्यांचा शिक्षणासाठीचा खर्च ज्याला आपण फी म्हणतो तो वर्षाला सहा आकड्यांमध्ये असतो. कोणे एकेकाळी या देशांमध्ये सामान्यांसाठी शिक्षण मोफत होते, आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. पूर्वीच्या काळी गरीब आणि श्रीमंत एकाच वर्गात आणि एकाच शाळेत शिकत असत. तेव्हा महिन्याला चार ते आठ आणे देणारा श्रीमंत समजला जाई. त्यावेळी शिक्षणात तरी कुठलाही भेदभाव नव्हता कारण त्याकाळी शिक्षक तळमळीने शिकवित असत. संपूर्ण अभ्यासक्रम ज्याला हल्ली आपण सिलॅबस म्हणतो तो अपूर्ण राहिला असेल. तर तेव्हाचे शिक्षक शाळा सुटल्यावरही आपला ज्यादा वेळ देऊन विद्यार्थ्यांना शिकवणे, हे आपले कर्तव्य आहे या भावनेतून शिकवीत असत. तेव्हाचे शिक्षक हे गुरुजी होते ते सरस्वतीचे उपासक होते, काही तसेच चांगले अपवाद सोडून आत्ताचे शिक्षक लक्ष्मी देवीची आराधना करतात. शाळेत भरमसाठ पगार मिळत असला तरी काही अपवाद सोडता सरकारी शाळा आता शिक्षणाचे केंद्र आहे असे वाटत नाही. हल्ली शिक्षकांनाही विविध कामे दिली जातात त्यामध्ये आपल्या गावात किती कुत्रे आहेत यांची गणती करण्याचे कामही दिल्याचे आम्ही ऐकलेले आहे. मतदानासाठी नाव नोंदणी करणे, गणना करणे वगैरे सारखी कितीतरी कामे सरकारी शाळांच्या शिक्षकांना करावी लागतात. खाजगी शाळांची परिस्थिती वेगळी आहे, शिक्षणाच्या नियमित राशी शिवाय इमारतीच्या बांधकामा पासून स्वच्छतागृहापर्यंत आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या नावाने वर्षभर वसुली चालूच असते. खरे पाहिले तर प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे पण आपली सर्व सरकारे याबाबतीत डोळे उघडे ठेवून झोपलेली दिसतात. त्यांचे कानही त्यांना जे ऐकायचे असते तेवढेच ऐकतात. आपले हे वर्ष तर संपले, संपणारे वर्ष आणि नवीन वर्ष यांच्या संधी काळात मोठ्या प्रमाणावर मानसिक सौख्यासाठी रात्रभर भिन्नभिन्न प्रकारचा उत्सव सुरू असतो. या उत्सवाच्या सुवासाने अनेक घटना आणि दुर्घटनाही घडतात पण आजच्या शुभ संधी काळात त्याची चर्चा न करता चांगल्याची चर्चा करूया. 'जुने जाउद्या मरणा लागूनि' असे न म्हणता 'जुने ठेवूया स्मरणासाठी, नववर्षात शुभ वर्तमानाच्या बांधू गाठी' इतकेच आपण म्हणूया. पुढील वर्षी नवनवीन शोधांद्वारे नव्यानव्या संधी प्रकाशात भाग्योदयाची नवी संधी शोधूया आणि इंग्रजाळलेल्या नववर्षाचे स्वागत करूया!

nagpurpost@gmail.com
mahasagarngp@gmail.com
Mob.No.9922970023




वर्ष २०२५ मधील अखेरचा दिवस, सरत्या वर्षाच्या मावळत्या सूर्याला नमस्कार करून निरोप देऊया.

**नववर्ष २०२६ तमाम देशवासियांना सुख-समृद्धी, भरभराट आणि आरोग्यपूर्ण जावो या शुभेच्छा!**

- संपादक दै. महासागर

## भाजपचे सहा उमेदवार बिनविरोध

**मुंबई, दि. ३१ विशेष प्रतिनिधी**

**राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी अजून पंधरा दिवस बाकी असतानाच राजकीय वातावरण तापलेले असताना, अचानक समोर आलेल्या एका घडामोडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी होणार असली, तरी त्याआधीच भाजपने विजयाचा नारळ फोडल्याची चर्चा सुरू झाली आहे. उमेदवारी अर्जांची लगबग, एबी फॉर्मसाठीची झुंबड, नाराजीनाट्य आणि पक्षांतरांच्या रणधुमाळीतच ही बातमी राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारी ठरते आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राज्यात भाजपाचे सहा नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत.**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत रेखा चौधरी आणि आसावरी नवरे या दोन नगरसेविकांना बिनविरोध विजय मिळाला आहे. प्रभाग १८ अ' मधून रेखा राजन चौधरी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अखेरच्या क्षणी कोणताही विरोधक अर्ज दाखल न केल्यामुळे ते बिनविरोध नगरसेविका ठरल्या. पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरणाऱ्या आसावरी केदार नवरे यांनी प्रभाग २६ (क) मधून खुल्या प्रवर्गातून अर्ज दाखल केला होता. त्यांच्या विरोधात एकही अर्ज न आल्यामुळे त्यांचा विजय निश्चित झाला. त्यानंतर रंजना पेणकर डोंबिवली 'प्रभाग २६ (ब)' मधून यांचा देखील बिनविरोध विजय झाला आहे. याशिवाय, पनवेल महानगरपालिकेत नितीन पाटील यांची प्रभाग क्रमांक १८ (ब) मधून बिनविरोध निवड झाली आहे. तसेच धुळे महानगरपालिकेत भाजपच्या उज्ज्वला भोसले या प्रभाग क्रमांक १ मधून नगरसेवक पदावर बिनविरोध निवडून आल्या आहेत. निवडणुकीला अजून वेळ असतानाच मिळालेला हा दुहेरी फायदा भाजपसाठी मानसिक आघाडी ठरतोय का? की हा केवळ सुरुवातीचा योगायोग आहे? आजच्या कागदपत्र पडताळणीनंतर संपूर्ण चित्र स्पष्ट होईल. मात्र, निवडणुकीपूर्वीच कल्याण-डोंबिवलीत उधळलेला हा विजयाचा गुलाल पुढील राजकीय समीकरणांवर काय परिणाम करणार याकडेच आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुंबई भाजप ॲक्शन मोडवर

### बंडोबांना थंड करण्यासाठी दिल्लीतून थेट सूत्रे हलली

**मुंबई, ३१ विशेष प्रतिनिधी**

उमेदवारी अर्जांची अंतिम मुदत संपताच मुंबई भाजप पूर्णपणे ॲक्शन मोडवर गेल्याचं चित्र आहे. अनेक प्रभागांमध्ये तिकीट न मिळाल्याने उफाळून आलेली बंडखोरी ही निवडणुकीपूर्वीच थंड करण्यासाठी पक्षाने वेगळी, बहुपातळी रणनीती आखली आहे. येत्या काही दिवसांत मुंबई भाजपच्या प्रत्येक हालचालीकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागणार आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, मुंबईतील सर्व जिल्हाध्यक्षांकडून बंडोबांची तपशीलवार यादी मागवली जाणार आहे. कोण कुठल्या वॉर्डातून नाराज आहे, कुणी अपक्ष अर्ज भरलाय, कुणाला कोणत्या कारणामुळे नाराजी आहे याचा प्रभागनिहाय, नेत्यांनिहाय आढावा घेतला जाईल. अर्जांची मुदत संपल्यानंतर हा आढावा अधिक तीव्रतेने सुरू झाला आहे.

या प्रक्रियेत दिल्लीतून थेट हस्तक्षेप झाल्याचंही स्पष्ट होतं. केंद्रीय सहसंघटनमंत्री यांनी नुकतीच मुंबईच्या नेत्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीत मुंबई भाजप अध्यक्ष यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. संदेश स्पष्ट होता बंडखोरी वाढू देऊ नका; प्रत्येक नाराजाशी थेट संवाद साधा.

बैठकीनंतर स्थानिक नेतृत्वांना ठोस सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. बंडखोरांशी संपर्क साधणे, त्यांची कारणे ऐकून घेणे आणि समेटाचा पहिला प्रयत्न स्थानिक पातळीवरच पूर्ण करणे ही जबाबदारी देण्यात आली आहे.

जर परिस्थिती आवाक्याबाहेर गेली, तर वरिष्ठ नेत्यांपर्यंत नेण्याची आणि त्यातून मार्ग काढण्याची जबाबदारीही स्थानिक नेत्यांवरच सोपवण्यात आली आहे.

उमेदवारी अर्ज २ जानेवारीपर्यंत मागे घेता येणार असल्याने पुढचे काही दिवस भाजपसाठी निर्णायक ठरणार आहेत. कोणते बंडोबा माघार घेतात, कोणांना पक्षातच सामावून घेतले जाते, आणि कुणाकडे कठोर भूमिका घेतली जाते यावर मुंबईतला अंतिम राजकीय ताळेबंद अवलंबून असेल. पक्षातील काही गटांना थोपवण्यासाठी समन्वय, समजूत आणि कडक संदेश या तिन्हीचा वापर होणार असल्याची चर्चा आहे. मुंबईतील बंडोबांचा संपूर्ण आढावा घेतल्यानंतरच पुढचा निर्णय घेतला जाणार आहे,

## नाशिक-सोलापूर 'सहा पदरी' महामार्गाला केंद्राची मंजुरी

**नवी दिल्ली, दि. ३१ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. नाशिक ते सोलापूर या ३७४ किलोमीटर लांबीच्या भव्य सहा पदरी महामार्गाला केंद्र सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. या प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्र एकमेकांना अधिक वेगाने जोडले जाणार आहेत.

या महामार्गाच्या बांधकामासाठी सुमारे १९ हजार १४२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. सध्या नाशिक ते सोलापूर प्रवासासाठी लागणारा ३१ तासांचा वेळ (जड वाहतुकीसह) आता थेट १७ तासांवर येणार आहे. तसेच सध्याचे ४३२ किलोमीटरचे अंतर कमी होऊन ते ३७४ किलोमीटरवर येईल. हा महामार्ग केवळ शहरांनाच नाही, तर ८ रेल्वे स्थानके आणि ६ विमानतळांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.


हा महामार्ग महाराष्ट्रातील महत्त्वाच्या चार जिल्ह्यांमधून जाणार आहे. यामध्ये नाशिक, अहिल्यानगर (अहमदनगर), धाराशिव आणि सोलापूरचा समावेश आहे. या महामार्गामुळे राज्याच्या दळणवळणाला नवी गती मिळेल. विशेषतः शेतमाल आणि औद्योगिक उत्पादनांच्या वाहतुकीसाठी हा मार्ग 'गेम चेंजर' ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नाशिक ते अक्कलकोट दरम्यानचा हा ग्रीनफिल्ड मार्ग वाढवण बंदर इंटरचेंजजवळ दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेला, नाशिकमध्ये राष्ट्रीय महामार्ग -६० (आडेगाव) च्या जंक्शनवर आग्रा-मुंबई कॉरिडॉरला आणि पांगरी (नाशिक जवळ) येथे समृद्धी महामार्गाला जोडण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रस्तावित मार्ग पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व किनारपट्टीपर्यंत थेट दळण वळण उपलब्ध करेल. चेन्नई बंदराच्या बाजूने, तिरुवल्लूर, रेणिगुंटा, कडप्पा आणि कुर्नूलमार्गे चेन्नई ते हसापूर (महाराष्ट्र सीमा) पर्यंत (७०० कि.मी. लांब) चार पदरी मार्गिकेचे काम प्रगतीपथावर आहे.

## संजय राऊत यांना बॉम्बने उडवण्याची धमकी

**मुंबई, दि. ३१ विशेष प्रतिनिधी**

मुंबईच्या राजकीय वर्तुळात आज अचानक अस्वस्थता पसरली. ठाकरे गटाचे खासदार आणि नेहमीच आक्रमक भूमिकेमुळे चर्चेत असलेले संजय राऊत यांना थेट बॉम्बनं उडवण्याची धमकी देण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा धमकीचा संदेश त्यांच्या घराबाहेर उभ्या असलेल्या गाडीवर लिहिलेला आढळून आला आणि क्षणातच संपूर्ण राजकीय वातावरण तापलं.



सत्ताधाऱ्यांवर सातत्यानं घणाघाती हल्ले करणाऱ्या राऊतांवर अशी थेट धमकी येणं, हे केवळ वैयक्तिक प्रकरण नसून, राजकीय दहशतीचा इशारा मानला जात आहे. संदेश नेमका कोणी, केव्हा आणि कशा हेतूने लिहिला याबाबत अद्याप गूढ कायम आहे. मात्र, हा प्रकार उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच मुंबई पोलीस तत्काळ संजय राऊत यांच्या निवासस्थानी दाखल झाले. परिसराची नाकाबंदी, गाडीची तपासणी आणि प्राथमिक चौकशी सुरू करण्यात आली. राऊत कुटुंबीयांचीही सविस्तर विचारपूस करण्यात आली असून, सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## पोलीस महासंचालकपदी सदानंद दाते ३ जानेवारीला पदभार स्वीकारणार

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

राज्याचे नवे पोलीस महासंचालक म्हणून सदानंद दाते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांचा पदावधी संपत आल्याने त्यांच्या जागी दाते यांची नेमणूक करण्यात आली आहे. गृह विभागाने बुधवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. सध्या राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एनआयए) प्रमुख असलेल्या दाते यांची केंद्रातील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणून त्यांना महाराष्ट्र केडरमध्ये पाठवण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी झाला होता. त्याचवेळी सदानंद दाते हे राज्याचे नवे पोलीस महासंचालक असतील हे स्पष्ट झाले होते. त्यानुसार येत्या ३ जानेवारीला दाते हे रश्मी शुक्ला यांच्याकडून पदाची सूत्रे स्वीकारतील. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पोलीस महासंचालक पदावरील नियुक्तीचा पदावधी हा दोन वर्षांचा असणार आहे.

## ११ जानेवारीला पंतप्रधान मुंबईत

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकाची निवडणूक सर्वच पक्षांसाठी महत्वाची आहे. ठाकरे बंधुंसाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई आहे तर देश, राज्य जिंकणाऱ्या भाजपसाठी मुंबई महापालिका एक अपूर्ण स्वप्न आहे. त्यामुळे भाजप ही निवडणूक जिंकण्यासाठी आपली सर्व ताकद पणाला लावणार हे निश्चित होते. आता घडतही तसचं आहे. मुंबई आणि आसपासच्या महानगरातील महापालिका जिंकण्यासाठी महायुतीने प्रचाराचा मास्टरप्लान बनवला आहे. ११, १२ आणि १३ जानेवारीला मुंबई, नवी मुंबई, बोरीवली, ठाणे आणि मिरा-भाईंदर या ठिकाणी महायुतीच्या मोठ्या सभा होणार आहेत. या सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अमित शाह आणि भाजपच्या इतर राज्यातील मुख्यमंत्र्यांचीही उपस्थिती असणार आहे अशी सूत्रांची माहिती आहे. विकासाच्या नावावर मुंबईत महायुतीच्या सभांचे आयोजन करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: मुंबईत येत आहेत. त्यांची सभा होणार आहे. यावर उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी टीका केली आहे. "महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रपतीला आणलं तरी आश्चर्य वाटणार नाही. परदेशात मोदींना मिठ्या मारणारे लोक आले तरी आश्चर्य वाटणार नाही. भाजपची ती परंपरा झाली आहे. ११ तारखेला मोदी मुंबईत येत आहेत. १३ तारखेला प्रचार संपतोय. एका खास धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले आहे" असे संजय राऊत म्हणाले.

## मिरा भाईंदरचा महापौर उत्तर भारतीय होणार

### कृपाशंकर यांच्या विधानाने वाद पेटण्याची चिन्हे

**भाईंदर, दि. ३१ प्रतिनिधी**

भाजपाने मुंबईसह सगळ्या महापालिका निवडणुकांसाठी कंबर कसली आहे. महायुतीनेही जोरदार तयारी केली आहे. तसंच महाविकास आघाडीही लढते आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनीही युती केली आहे. अशातच मीरा भाईंदरमध्ये कृपाशंकर सिंह यांनी एक वक्तव्य केले आहे. उत्तर भारतीय महापौर बसेल इतके नगरसेवक निवडून आणू असे वक्तव्य कृपाशंकर सिंह यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात भुवया उंचावल्या आहेत.



"बिहारच्या निवडणुकीनंतर ही नववी सार्वजनिक निवडणूक आहे. लवकर महापालिका निवडणुका व्हाव्यात अशी जनतेची इच्छा होती. मीरा भाईंदरसह २९ महापालिकांमध्ये भाजपा महायुतीची सत्ता येईल. शिवाय इतके नगरसेवक निवडून आणू की उत्तर भारतीय महापौर बसेल." असा दावा कृपाशंकर सिंह यांनी केला आहे. कृपाशंकर सिंह यांचं हे वक्तव्य चर्चेत आले आहे.

कृपाशंकर सिंह पुढे म्हणाले, नकली शिवसेना गेली, आता खरी शिवसेना आमच्याबरोबर आहे. हिंदुत्व आणि विकास हा आमचा मुद्दा आहे. देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व मजबूत आहे. उत्तर प्रदेशात बाबा का बुलडोझर चालतो तसा देवेंद्र फडणवीस यांनी विकासाचा बुलडोझर महाराष्ट्रात सुरु आहे. जो कुणी विकासाच्या आड येईल त्यांना उद्ध्वस्त करुन भाजपाच्या नेतृत्वात २९ महापालिकांमध्ये भाजपा-महायुतीची सत्ता येईल असे कृपाशंकर सिंह यांनी म्हटले आहे.

मीरा भाईंदरचा विकास भाजपाने कसा केलाय? हे उत्तर भारतीयांना सांगण्याची गरज होती म्हणूनच हा आजचा मेळावा होता. आम्ही प्रत्येक समाजाच्या बैठकीचं आयोजन केलं. मीरा भाईंदरमध्ये वेगवेगळ्या समाजाचे मेळावे आम्ही घेत आहोत. आमची भूमिका त्यांच्यासमोर ठेवत आहोत. मीरा भाईंदरमध्ये बहुतांश महापौर उत्तर भारतीय होते, आताही उत्तर भारतीय महापौर असेल असं नरेंद्र मेहतांनी म्हटलं आहे. महापालिका निवडणुकांचा प्रचार आता लवकरच सुरु होईल. दरम्यान मीरा भाईंदरमध्ये कृपाशंकर सिंह यांनी जे वक्तव्य केलं त्याची चर्चा रंगली आहे.




## संभाजीनगरमध्ये नाराज इच्छुकांचा आक्रोश, कराड यांच्या कारला घेराव

**छ.संभाजीनगर, दि. ३१ प्रतिनिधी**

महायुती तुटल्यानंतर छत्रपती संभाजीनगर भाजपमध्ये उमेदवारी वाटपावरून सुरू असलेला वाद आता नियंत्रणाबाहेर गेल्याचं चित्र दिसून येत आहे. भाजपच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयासमोर संतप्त कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. यावेळी कार्यकर्त्यांनी माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांची गाडी रोखून धरली, तर कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या गाडीला काळे फासून आपला तीव्र निषेध नोंदवला. एका कार्यकर्त्याने अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. यावेळी पोलिस संरक्षणात सावे आणि कराड यांनी काढता पाय घेतला.



छत्रपती संभाजीनगरमध्ये उमेदवारीवरून भाजपमध्ये सलग दुसऱ्या दिवशीही मोठ्या प्रमाणावर गोंधळ निर्माण झाल्याचं चित्र दिसून येत आहे. संतापलेल्या इच्छुक उमेदवारांनी आणि संतप्त कार्यकर्त्यांनी भाजप नेते भागवत कराड आणि अतुल सावे यांच्या गाडीला घेराव घातला, यावेळी त्यांनी मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त करत गंभीर स्वरूपाचे आरोप देखील केले. यावेळी संतापलेल्या भाजप कार्यकर्त्यांनी सावे आणि कराड यांचे फोटो फाडले. इच्छुक उमेदवारांनी घटनास्थळी गोंधळ घातल अंगावरती पेट्रोल ओतून घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्याचबरोबर सावेंच्या पीएला आणि नातेवाईकांना तिकीट दिल्याचा आरोप केला आहे.

संतापलेल्या भाजप कार्यकर्त्यांनी सर्वे दाखवत आम्हाला न्याय मिळाला पाहिजे. अतुल सावेंना नेमकं काय भेटलं, त्यांनी त्यांच्या पीएला उमेदवारी दिली, त्यांनी फक्त वंजारी लोकांना पुढे केलं, त्यांनी आत्ताच्या आत्ता सर्वे आणावा, जर त्यात माझं नाव नाही आलं तर मी आयुष्यभर त्यांची गुलामी करेन, भागवत कराडांनी फक्त वंजाऱ्यांना तिकीट दिलं, असं म्हणत कार्यकर्त्यांनी अतुल सावे आणि भागवत कराड यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. एकेरी शब्दात उल्लेख करत कार्यकर्त्यांनी शिवीगाळ केल्याचंही यावेळी दिसून आलं.

# नववर्षाचे स्वागताबरोबरच करा संकल्प!

२० २६ सालात आपण पदार्पण करित आहोत. गतवर्षाच्या अनेक गोड कडू आठवणी घेऊन पुढे जात असतो. नवीन वर्षात आपण प्रवेश करतो म्हणजे काय? आपण तेच असतो. आजूबाजूची परिस्थिती तीच असते. फक्त एक जाणीव असते मनामध्ये.

कालनिर्णय, महालक्ष्मी,सनातन, दिनदर्शिका आणि अशा अनेक दिनदर्शिका बाजारात येतात त्या आणणे... तसेच नव्या वर्षाच्या रोजनिशी अर्थात डायऱ्या बाजारात आलेल्या आहेत. गेल्या बऱ्याच वर्षापासून मी गीता प्रेस गोरखपुर ची रोजनिशी- डायरी घेत असतो .आता ही ती आणली आहे. काही वर्षांपूर्वी खूप प्रकारची शुभेच्छा कार्डही विक्रीला येत होती. आताही येतात परंतु त्याच एवढे आकर्षण राहिलेलै नाही. आता व्हाट्सअप, इंस्टाग्राम आणि फेसबुक वगैरे मुळे नववर्ष शुभेच्छा कार्ड पाठवण्याची पद्धत जवळपास बंदच झाली आहे. त्याऐवजी व्हाट्सअप वर शुभेच्छा दिल्या जातात. नवीन वर्षात निरनिराळे वैयक्तिक आणि सामाजिक विषय समोर ठेवून संकल्प केले जात असतात. खरंतर नवीन वर्षाचे संकल्प करण्यापूर्वी गतवर्षात आपण काय ठरवले होते, काय संकल्प केले होते, ते कितपत पूर्ण झाले याचा विचार करणे हे तेवढेच आवश्यक आहे.



-दिलीप देशपांडे. ८९९९५६६९१७

त्यामुळे नवीन वर्षाच्या वळणावर आपण काय करायला हवे ते ठरविता येते. "संकल्प" म्हणजे काय तर आपणच आपल्याला दिलेले जे वचन असते. आणि आपण जर स्वतः दिलेले वचन जर पाळू शकत नसलो तर दुसऱ्याला दिलेले वचन कसे पाळणार ? तेव्हा आपण म्हणतो ना वचनाला जागला तर... त्यात याच गोष्टीचा अंतर्भाव असतो, आणि त्यातून एखादी गोष्ट ठरवून कोणाला काही देणे ह्यात आपण आपला सकारात्मक बदल किंवा सकारात्मक विचार पुढे नेऊ शकतो.. नवीन वर्षात आपण अनेकविध संकल्प करू शकतो. त्यात आपण काही वैयक्तिक स्वरूपात गोष्टी करायचे ठरवतो तर काही सामाजिक देणे. "देणे समाजाचे" म्हणून ते करायचे असतात. वैयक्तिक संकल्पा मध्ये मध्ये वाचनाचा संकल्प करणे, लिखाणाचा संकल्प करणे, भेट वस्तू देतांना एखादे चांगले पुस्तक भेट द्यावे. दरमहा एक पुस्तक वाचण्याचा संकल्प, आरोग्य विषयी काही काळजी घेणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे, व्यसनापासून दूर राहणे, सामाजिक गोष्टी मध्ये पर्यावरण, प्रदूषण, वृक्ष लागवड, स्वयंसेवी संस्थांना मदत करणे, आपल्या घरात आपण टाकून दिलेली आहे परंतु वापरण्याजोगी कपडे असल्यास ते त्या त्या संस्थाला देणे, गरजूंना मदत करणे एखाद्या वाचनालयाला




पुस्तकांची भेट देणे. सामाजिक कार्यात किंवा आपण सर्वांशी निगडित एखादा संकल्प करतो त्यावेळेला आपण केलेल्या संकल्प हा इतरांसाठी महत्त्वाचा आहे ,जसा जो तो आपल्यासाठी आहे आणि आपणच जर त्याचे उल्लंघन केलं तर त्यापासून आपल्या होणाऱ्या नुकसाना बरोबरच इतर अनेकांची नुकसान होऊ शकते त्यामुळे ही जाणीव मनामध्ये प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे आणि अशी जाणीव जर आपल्या मनात निर्माण झाली तरच आपण केलेले संकल्प पुर्णत्वास नेऊ शकतो. जसे आपल्याकडून जर प्रदूषण आणि पर्यावरणाची हानी होत असेल तर ती आपल्याला जर त्रासदायक आहे पण त्याचबरोबर त्यामुळे असंख्य लोकांना त्यापासून उपद्रव होऊ शकतो त्यामुळेच ही जाणीव महत्त्वाची आहे. आपली प्रतिष्ठा ही सुद्धा संकल्प करताना महत्वाची असते. म्हणजे जसे संकल्प करताना आपले समाजातले स्थान, मित्र मंडळीतले स्थान, नातेवाईकांमध्ये स्थान, अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो आणि आपण जे संकल्प जाहीर करतो ते जर पूर्ण केले नाही तर त्यामुळे आपल्या प्रतिष्ठेला धोका पोहचतो म्हणजेच संकल्प करताना प्रतिष्ठा ही सुद्धा प्रेरणाच असते. त्यासाठी हा विचार होणे आवश्यक आहे. म्हणजेच आपण जे काही संकल्प करतो ते जाहीर करणे आवश्यक आहे आणि फायद्याचा सुद्धा आहे. भ्रष्टाचार मुक्ती अभियानास सहकार्य करणे थोडक्यात भ्रष्ट मार्गाने काम करून न घेणे. रस्त्यावर वाहन उभे करून अडथळा निर्माण न करणे. कार्यक्रमात डी.जे. सारखे वाद्य वाजवून ध्वनी प्रदूषण करणे टाळायला हवे. वृक्षतोड करणे टाळावे त्याऐवजी वृक्षारोपण करावे. एक तरी झाड लावण्याचा आणि जगण्याचा संकल्प करावा. पाण्याचा योग्य वापर करणे आणि अनावश्यक वापर करण्याचे टाळावे. स्त्री भ्रूणहत्या, स्त्री अत्याचार विरोधात अभियानास मदत करणे, प्लास्टिक पिशव्यांचा किंवा हानिकारक प्लास्टिक चा वापर न करणे. लव्हजिहाद, धर्मांतरणा सारख्या गोष्टीवर वक्ष ठेवून जागृती करणे, सार्वजनिक जागी कचरा करणे, गुटखा पुड्या टाकणेआणि अस्वच्छता करणे टाळायला हवे. कुठलेही व्यसन न करणे. या प्रकारे हे जे सामाजिक जाणीव मनात ठेवून करायचे संकल्पन ते प्रत्येकाने करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यामुळे आपल्यालाही आणि संपूर्ण समाजालाही त्यापासून काही धोका पोहोचू शकत नाही. चांगले कार्य करणाऱ्या संस्थेला काही आर्थिक मदत करता आल्यास ती करावी. अनेक सेवाभावी संस्था आहेत,आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या निराधार मुलांना सांभाळून त्यांचे राहण्याचा शिक्षणाचा खर्च करून बऱ्याच संस्था समाजात चांगले कार्य करत आहेत, यातील अनेक मुल मुली आज उच्च शिक्षण घेत आहेत. त्यांना आर्थिक मदत करणे किंवा संस्थेला एक दिवसाचे अन्नदान, त्यांना ड्रेस, पुस्तके, वगैरेसाठी मदत आपण करू शकतो. तर आपल्यालाही चांगले कार्य केल्याचे आत्मिक समाधान मिळते. राजकीय नेत्यांनी त्यांच्या स्वागताचा होणारा हार, गुच्छ, होर्डिंग, यावर होणारा मोठा खर्च टाळावा. नवीन वर्षात शेतीमालास चांगला भाव मिळण्यासाठी, बेरोजगारी कमी करून महागाई कमी करण्याचा संकल्प करावा. युवाशक्तीचा वापर फक्त निवडणुकीच्या कामी करणे बरोबरच त्यांच्या बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी विशेष लक्ष द्यायला हवे. राजकीय नेत्यांनी बोलताना मोजकेच आणि सगळ्यांच्या हिताचे बोलावे ज्यामुळे वाद विवाद होतील आणि सामाजिक ऐक्य बिघडेल असे पातळीसोडून बोलू नये. अशा प्रकारचे वक्तव्य करू नये. सध्या अर्वाच्य, पातळी सोडून बोलणे खूपच होते. त्यावर सुध्दा विचार करायला हवा आहे. स्त्रियांवरील अत्याचार कमी होत नाहीत,शाळांमधून शिक्षकांकडून होणारे लैंगिक अत्याचार थांबायला हवे.राज्यात त्यासाठी महिला आयोग आहे परंतु त्यांच्याकडून फारशी कामे होत नाहीत आणि त्यामुळे त्याविषयी मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे, याविषयी विचार करुन कार्यवाही व कारवाई होणे आवश्यक आहे.

वर्षाच्या शेवटच्या महिन्याचे काही दिवस हे आत्मपरीक्षणाची असतात, त्यादृष्टीने गतवर्षी आपण मनात काय योजिले होते कुठले संकल्प केले होते, याचे खरंच आत्मपरीक्षण करायचे असते, आणि झालेल्या चुका या वर्षी परत होणार नाही हीसुद्धा खबरदारी घ्यावयाची असते. म्हणून नववर्षाच्या सुरुवातीला संकल्प तर आपण करतो पण वर्षभरात त्याची पूर्तताही करायची असते याची जाणीव सतत मनात असू द्यावयाची असते...तरच संकल्प पूर्ती होईल. गतवर्षाची गोळाबेरीज करुन जे जे चांगले होते ते ठेवून वाईट होते त वजा करून, नवा संकल्प करून नवीन आशा पल्लवित करू या..!! सर्वांना येणारे 2026 हे वर्ष आरोग्यदायी, समृद्धीचे आनंदाचे येवो, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.... सगळ्यांना शुभेच्छा.!

dilipdeshpande24@gmail.com

# कुशेगावच्या शेतकऱ्यांना वनराई बंधारा ठरला फायदेशीर

**बेलगाव कुऱ्हे ।** इगतपुरी तालुक्यातील कुशेगाव येथे तालुका कृषी अधिकारी रामदास मडके यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदानातून तयार करण्यात आलेला वनराई बंधारा शेतकऱ्यांना फायदेशीर ठरला आहे. या भागात दरवर्षी पाणी टंचाईला तोंड दयावे लागते. शेती आणि जनावरांसाठी पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो अशा संभाव्य समस्या लक्षात घेऊन येथील शेतकरी तुकाराम म्हसणे, देवराम म्हसणे यांच्या शेताजवळील नाल्यावर वनराई बंधारा तयार करण्यात आला आहे.

या वनराई बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील गहू, हरभरा, व भाजीपाला पिके घेतली आहेत. वनराई बंधारामुळे शेतकऱ्यांचे लागवडी खालील क्षेत्र वाढले आहे. भाजीपाला पिकांमध्ये शेतकरी तुकाराम घारे यांनी वांग्याचे पीक घेतले असल्यामुळे त्यांना त्यातून उत्पादन सुरु असून, त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली आहे. वनराई बंधाऱ्यामुळे गुरे, जंगली जनावरे



यांना पिण्यासाठी पाण्याची सोय झाली आहे. अशा पद्धतीने हा वनराई बंधारा फायदेशीर ठरत आहे. वनराई बंधारा तयार करण्यासाठी गावातील शेतकरी यांनी श्रमदान केले. तालुक्यात 240 वनराई बंधारे पूर्ण झाले असून, अंदाजे 95 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल असे तालुका कृषी अधिकारी रामदास मडके यांनी सांगितले.

### असे बांधले जातात वनराई बंधारे

ओढे, नाल्यांमधून मोठ्या प्रमाणात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी वनराई बंधाऱ्यांची निर्मिती करण्यात येत आहे. पाणी जमिनीत जिरल्यामुळे आसपासच्या भागातील विहिरीच्या पाण्यात वाढ होते. वनराई बंधाऱ्यासाठी माती, मुरूम, दगड गोटे, सिमेंटच्या रिकाम्या गोण्यांचा वापर करून हे बंधारे बांधले जातात. पावसाचे पाणी जागोजागी अडवून पुनर्भरण करण्याचे नियोजन करण्यात आले. जेथे कमी पर्जन्यमान आहे अशा भागात नाल्यातून पाणी वाहते तेथे वनराई बंधारे साखळी पध्दतीने बांधण्याची आखणी करण्यात येते.

याप्रसंगी तांत्रिक मार्गदर्शन मंडळ कृषी अधिकारी अजय खैरनार, उप कृषी अधिकारी के. एस. सोनवणे, पी. ए. भोये यांनी केले.

# मतदार यादीतील दुबार नावे वगळण्यासाठी अर्ज सादर करावेत : जिल्हाधिकारी

**नाशिक ।** विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीतील दुबार नावे यांची पडताळणी करून ते वगळण्याबाबत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी निर्देश दिले आहेत. त्यानुसार १२५ नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघातील दुबार, स्थलांतरीत व मृत मतदारांची नावे वगळण्याबाबत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्यामार्फत किंवा आवश्यक कागदपत्रांसह https://voters.eci.gov.in या संकेस्थळावर नागरिकांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

१२५ नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातील दुबार नोंदी असलेल्या मतदारांची यादी https://nashik.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. दुबार, स्थलांतरीत व मृत मतदारांची माहिती संकलित करण्याचे काम मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत गृहभेटीद्वारे सुरू आहे. मतदार यादी अचूक व त्रुटी विरहीत राहण्यासाठी सर्व मतदारांनी आपले नाव दुबार आहे का? किंवा असल्यास कोणत्या यादी भागात आहे, याची माहिती संकेस्थळावरून करून घ्यावी, असेही जिल्हा निवडणूक अधिकारी प्रसाद यांनी कळविले आहे.

# स्वरांजली स्टुडिओतर्फे शनिवारी संगीतसेवा पुरस्कार, मैफल

**नाशिक ।** स्वरांजली कराओके स्टुडिओच्या पाचव्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने शनिवारी (दि.३) स्व. वसंत देसाई स्मृती संगीतसेवा पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी विनामूल्य मैफल देखील होईल असे संचालक हर्षद शिंत्रे यांनी सांगितले.

संध्याकाळी ६ वाजता इंदिरानगर येथे भुजबळ फार्मजवळ हर्ष - राज सभागृहात होणाऱ्या सोहळ्यात प्रमुख पाहुणे डॉ. प्रमोद शिंदे आणि ज्येष्ठ पत्रकार सुरेश भटेवरा यांच्या हस्ते उत्कृष्ट कलाकारांना पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येईल. यावेळी होणाऱ्या संगीत मैफलीत राजेश दाणी, संजय कथुरिया, राजेंद्र जाधव, सिध्दांत क्षीरसागर, अंश सोनवणे, रेवती वाघमारे, अंजली सहस्त्रबुद्धे , हेमांगी जोशी, मृणाल महाजन, उत्पला शिंदे हे कलाकार लोकप्रिय सुरेल गाणी सादर करतील. नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

**या उत्कृष्ट कलाकारांचा होणार सन्मान**– गायिका अश्विनी सरदेशमुख, गायक संजय अडावदकर, बालकलाकार रिया कुलकर्णी, निवेदक समीर ओतुरकर, संयोजक हरीश ठक्कर यांचा समावेश सत्कारार्थींमध्ये आहे. कलाकारांना सातत्याने प्रोत्साहन देणारे ८० वर्षांचे रसिक श्रोते जयंत दामले यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात येईल.

# कर्करुग्णांच्या मदतीसाठी उद्या 'आर.डी. वाइब्स' मैफल

**नाशिक ।** येथील कलास्मृती फाउंडेशनतर्फे कर्करुग्णांना मदत करण्यासाठी एक चॅरिटी शो 'आर.डी. वाइब्स 'आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवारी दि.२ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ५ वाजता कालिदास कलामंदिर येथे होणाऱ्या या मैफलीत संगीतकार आर.डी. बर्मन यांची सुप्रसिद्ध गाणी सादर करण्यात येणार आहेत.

पार्श्वगायिका अमृता दहिवेलकर, सुरभी गौड, प्रियांका कोठावडे, नेहा आहेर, सारिका शिरुडे तसेच लोकप्रिय गायक अजय पाटील, जयदीप जाधव, दीपक दोडे सहभागी होणार आहेत. इंटरनॅशनल म्युझिक लव्हर्स ऑर्केस्ट्राचे संयोजन प्रशांत महाले करतील. ध्वनी व्यवस्था पवन वंजारी व तांत्रिक बाजू संजय गाडे सांभाळणार आहेत. नाशिककर रसिकांनी या उदात्त कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# नाशिक जिल्ह्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांना या निर्णयाचा होणार फायदा

**नाशिक ।** माजी खासदार समीर भुजबळ यांच्या पाठपुराव्यातून खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान भरडधान्य खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणी करिता दि.३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या निर्णयामुळे मका,रागीसह भरड धान्य आणि धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

येवल्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत माजी खासदार समीर भुजबळ यांच्या हस्ते नुकत्याच दोन खरेदी केंद्रांचा शुभारंभ करण्यात आला. यंदाच्या वर्षी मकासह धानाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन झालेले आहे. तसेच अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान देखील अधिक झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मका व धानासाठी योग्य दर मिळावा यासाठी शासनाच्या वतीने करण्यात येणाऱ्या आधारभूत किंमत खरेदी योजनेसाठी मुदतवाढ मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी माजी खासदार समीर भुजबळ यांच्याकडे केली होती. या मागणी नंतर माजी खासदार समीर भुजबळ यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे मुदतवाढ देण्यास मागणी केली होती. त्यानुषंगाने खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये धान/भरडधान्य खरेदीकरिता शेतकऱ्यांच्य नोंदणी प्रकियेला दि.३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शेतकरी नोंदणीस देण्यात आलेल्या मुदतवाढ कालावधीत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करुन शेतकऱ्यांच्या नोंदणीची कार्यवाही करावी,असे अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सूचित केले आहे. खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये धान व मका,ज्वारी,रागीसह भरड धान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणी पूर्ण केलेल्या पात्र शेतकऱ्यांकडूनच शासनामार्फत आधारभूत किंमतीने धान्याची खरेदी करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार, शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून शेतकऱ्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील धान व मका, ज्वारी, रागीसह भरड धान्य उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून अधिकाधिक शेतकऱ्यांना शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेता येणार आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह आपली ऑनलाईन नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन माजी खासदार समीर भुजबळ यांच्याकडून करण्यात आले आहे.

# एबी फॉर्म नाकारल्याने अपंग उमेदवाराचा संताप; आ. सीमा हिरे यांच्याविरोधात घोषणाबाजी

**नाशिक ।** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज भरण्याची धावपळ सुरू असतानाच एबी फॉर्म नाकारण्यात आल्याने इच्छुक असलेल्या एका अपंग उमेदवाराचा संताप अनावर झाल्याची घटना आज घडली. संबंधित उमेदवाराने थेट तोंड झोडून घेत भाजप व स्थानिक नेतृत्वाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या गोंधळात आमदार सीमा हिरे यांच्यावरही तीव्र टीका करण्यात आली.



प्राप्त माहितीनुसार, सदर अपंग उमेदवार गेल्या अनेक दिवसांपासून उमेदवारीसाठी पाठपुरावा करत होता. मात्र ऐनवेळी एबी फॉर्म नाकारण्यात आल्याने त्याचा संताप उसळला. “निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून ऐनवेळी आलेल्यांना संधी दिली जात आहे,” असा आरोप करत त्याने पक्ष कार्यालय परिसरात जोरदार घोषणाबाजी केली. काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेमुळे भाजपमधील अंतर्गत नाराजी पुन्हा एकदा उघड झाली असून, उमेदवारी प्रक्रियेतील अपारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विशेषतः अपंग उमेदवारासारख्या सामाजिकदृष्ट्या संवेदनशील घटकाला न्याय न मिळाल्याचा आरोप होत असल्याने प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. दरम्यान, या प्रकरणावर पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसून, उमेदवारी वाटपावरून सुरू असलेला असंतोष पुढील काही दिवसांत आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### नव वर्ष आले...

नव्या वर्षाची ती आतुरता
नव्या संकल्पांची चतुरता
नवी उमेद नवी आकांक्षा
जुने वर्ष सरता सरता
-१-
सुख दुःख हिशेब पुरता
दैनंदिनी नोंदण्यापुरता
ठेव सारे मनात सांगतो
हर क्षण झरता झरता
-२-
जुने व्रण न ये विसरता
स्वप्नभंग, अपेक्षा करता
नोंद कधी होई स्मृती मध्ये
आठवणी विरता विरता
-३-
नववर्ष नवीन ठरता
नवे प्रकल्प कास धरता
नवा हुरूप नवा जल्लोष
कालचक्र फिरता फिरता
-४-

- **बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर पुनावळे, पुणे ३३**

# प्राथमिक विद्यामंदिरचा पारितोषिक वितरण उत्साहात

**नाशिक ।** प्राथमिक विद्यामंदिरचा पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे माजी कार्यवाह अनिल कुरविनकोप होते. तर प्रमुख पाहुण्या बाल साहित्यिक स्मिता बनकर उपस्थित होत्या.

प्रमुख उपस्थितीमध्ये शालेय समिती सदस्य विवेक पुरकर, रोहिणी कुलकर्णी तसेच शाळेच्या माजी विद्यार्थिनी तेजस्विनी पत्की, माधवी मांडळकर, मीना पत्की उपस्थित होते. मुख्याध्यापिका भारती ठाकरे यांनी प्रास्ताविकातून शाळेत राबवीत असलेल्या उपक्रमाबाबत माहिती दिली. प्रमुख अतिथींचा परिचय मनीषा गुंजाळ यांनी केला. प्रमुख पाहुण्या स्मिता बनकर यांनी मूकबधिर विद्यार्थी अडचणीवर मात करून शिक्षण घेतात, आपण तर सर्वसामान्य विद्यार्थी आहोत, आपण शिक्षणात पुढे गेलेच पाहिजे. त्यांनी लिहिलेली पुस्तके शाळेला भेट दिली. अध्यक्षीय मनोगतातून अनिल कुरविनकोप यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, शिक्षण घ्या पुढे जा आणि राष्ट्राचा विकास करा.



वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांचे क्रीडा स्पर्धांचे उपस्थित मान्यवरांचे हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. पारितोषिक वितरण यादी वाचन अनिता रावळ यांनी केले. बालवाडी शिक्षिका दिपाली गमे, जयश्री खैरनार यांचे विशेष सहकार्य कार्यक्रमात लाभले. शाळेच्या माजी शिक्षिका कै.मालती क्षेमकल्याणी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्या माधवी मांडळकर आणि नात तेजस्विनी पत्की यांच्यातर्फे शाळेला स्पीकर सेट व विद्यार्थ्यांसाठी वह्या आणि खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन शिक्षिका मीनल कांबळे यांनी केले.

# वारली चित्र सहलीत पारंपरिक तारपा नृत्य ठेक्याची अनुभूती

**नाशिक ।** अनोख्या वारली चित्रसहलीत सर्वांनी भरपूर आनंद मिळवला. पत्रकार आणि वारली चित्रशैली अभ्यासक संजय देवधर यांनी आयोजित केलेल्या वारली चित्रसहलीत आदिवासी वारली चमूने पारंपरिक तारपा नृत्याचा ठेका धरून वैशिष्ट्यपूर्ण रंग भरले. प्रगती अहिरे, भारती व सोनिया कुटे, मीना पाठक, पल्लवी व व्योम काळे, गीता व दीपिका पोळ, स्वाती व प्रसाद आराध्ये, डॉ. देवयानी व प्रफुल्ल वाकडे, माधुरी पाटील, डॉ. राजश्री गवारे हे कलाप्रेमी सहलीत सहभागी झाले.

रविवारी नाशिकहून सकाळी ७ वाजता सहलीला प्रारंभ झाला. जव्हारच्या दिव्य विद्यालयात प्रमिला कोकड यांनी स्वागत केले. स्वादिष्ट नाश्ता, चहा यांनी सर्वांना ताजेतवाने केले. नंतर अंबिका चौकातील तारपा वादकाचा पुतळा आणि क्लस्टरला भेट



दिली. तेथील कर्णबधीर कलाकारांच्या सुंदर कलाकृती बघून सर्वांना समाधान वाटले. नंतर घाट उतरून सहल पाथर्डी पाड्यावर सिताराम बुजड याच्या घरी पोहोचली. तेथे सपना हिने सर्वांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत केले. जातांना वाटेत कमळांच्या तळ्याने लक्ष वेधून घेतले. सुरेख वारली चित्र प्रात्यक्षिक झाल्यावर गरमागरम सुग्रास भोजनाने सर्वांना तृप्त केले. सपना व तिच्या दोन मुलींनी उत्तम स्वयंपाक केला. तेथे वारली चित्रे, लाकडी वस्तूंची खरेदी झाली. रामखिंड पाड्यावर भगवान कडू व परिवारातील सर्वांनी कागदाच्या लगद्यापासून केलेल्या कलात्मक वस्तू , तारपा वाद्य, बोहाड्याचे मुखवटे असा सुंदर खजिना अनुभवता आला. सुदाम भोये याच्या घरी लग्नचौक - देवचौक, भाताची कणगी बघायला मिळाली. पुढे सिल्वास रस्त्यावर पांडुरंग चौधरी याच्या वारली कलाकेंद्राला भेट दिली.

आता संध्याकाळ होताना सर्वांना तारपा नृत्याचे वेध लागले. दिव्य विद्यालयात येताच चहापान झाल्यावर नृत्याला प्रारंभ झाला. पारंपरिक वेशभूषेत आलेल्या वारली महिला, तारपा व ढोल वादक यांनी नृत्यात रंग भरले. पहाता पहाता सर्वजण त्यात सामील झाले. दिवसभरात अनुभवलेली वारली कला, निसर्गस्नेही जीवनशैली, प्रथा, परंपरा, पर्यावरणपूरक संस्कृती, मनात साठवून परतीचा प्रवास सुरु झाला.अनोख्या वारली चित्रसहलीत छोट्या व्योम पासून सर्वांनी भरपूर आनंद मिळवला. गीता पोळ यांनी सतत सहल हसती खेळती ठेवली. पुढील चित्रसहल नववर्षात रविवार ११ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येणार आहे

# गंगापूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई

## विनापरवाना अग्निशस्त्र बाळगणारे दोघे जेरबंद, तब्बल २.३७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नाशिक ।** आगामी नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली असून, गंगापुर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने अत्यंत धाडसी आणि उल्लेखनीय कामगिरी बजावत विनापरवाना अग्निशस्त्र बाळगणाऱ्या तिघा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत एक देशी बनावटीचा गावठी कट्टा, एक जिवंत काडतूस, चोरी केलेले ॲपल कंपनीचे दोन मोबाईल फोन तसेच बजाज पल्सर मोटारसायकल असा एकूण २,३७,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नाशिक शहरात वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार परिमंडळ स्तरावर आढावा घेऊन पोलिसांना विशेष सतर्कता ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. याच दरम्यान गंगापुर पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथकाला कॅनॉल रोड परिसरात दोन संशयित इसम पिस्टलसह बसल्याची गुप्त माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हे शोध पथकाने तात्काळ कॅनॉल रोड, शिंदोरे रस्त्याच्या पुढील भागात सापळा रचला. मोठ्या लोखंडी पाईपजवळ एक बजाज पल्सर मोटारसायकल उभी असून पाईपमध्ये दोन इसम संशयास्पद हालचाली करत असल्याचे आढळले. पोलिसांनी क्षणाचाही




**जप्त मुद्देमाल**– २५,००० रुपये किमतीचा देशी बनावटीचा गावठी कट्टा, २,००० रुपये किमतीचे एक जिवंत काडतूस, १,००,००० रुपये किमतीची बजाज पल्सर मोटारसायकल, ३०,००० रुपये किमतीचा आयफोन १४ प्रो मॅक्स, ८०,००० रुपये किमतीचा आयफोन १७.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णीक, नाशिक शहर, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, परिमंडळ–०१, नाशिक शहर तसेच सहायक पोलीस आयुक्त सुधाकर सुरडकर, सरकारवाडा विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ही धडाकेबाज कारवाई गंगापुर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) काजल मोरे, पोलीस उपनिरीक्षक भारत पाटील, पोलीस हवालदार रविंद्र मोहीते, पोलीस अंमलदार घनश्याम भोये, मच्छिंद्र वाकचौरे, राकेश राऊत, मुकेश गांगुर्डे, विजय नवले व पोतन यांच्या सहभागातून यशस्वीरीत्या पार पडली असून, सदर गुन्ह्याचा पुढील सखोल तपास पोलीस उपनिरीक्षक भारत पाटील करीत आहेत.

विलंब न करता सापळा यशस्वी करत दोघांना जागीच ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपींची नावे तौफिक इक्बाल हाशमी (रा. श्रमिकनगर, शिवाजीनगर, नाशिक) आणि समीर अशोक गुंजाळ (रा. गोवर्धन गाव, नाशिक) अशी निष्पन्न झाली. अंगझडती घेतली असता तौफिक इक्बाल हाशमी याच्या कमरेला एक देशी बनावटीचा गावठी कट्टा व एक जिवंत काडतूस मिळून आले. तसेच त्यांच्या ताब्यातून बजाज पल्सर मोटारसायकल जप्त करण्यात आली. याप्रकरणी गंगापुर पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम व महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. अटक आरोपींची कसून चौकशी केली असता, सदर गावठी कट्टा व काडतूस हे मो. फैजान शेख (रा. संजीव नगर, अंबड; मूळ रा. बकेबर, जि. इटावा, उत्तर प्रदेश) याच्याकडून खरेदी केल्याचे उघड झाले. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ कारवाई करत मो. फैजान शेख यालाही अटक केली. याच तपासात आणखी धक्कादायक माहिती समोर आली. आरोपी तौफिक इक्बाल हाशमी आणि समीर अशोक गुंजाळ यांनी गंगापुर रोड परिसरात पायी जाणाऱ्या नागरिकांकडून बळजबरीने ॲपल कंपनीचे आयफोन १४ प्रो मॅक्स आणि आयफोन १७ असे दोन महागडे मोबाईल फोन हिसकावून नेल्याचे निष्पन्न झाले. या चोरीच्या गुन्ह्यांचीही उकल करत संबंधित मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.


# सिन्नर तालुक्यातील पांगरी येथे 'भारत क्रांती मिशन'चे महाअधिवेशन

## १४० कोटी भारतीयांना जोडणारी 'जय शिवराय' स्वाक्षरी मोहीम!



**नाशिक ।** अखंड भारताची संकल्पना आणि आर्थिक साक्षरतेच्या माध्यमातून राष्ट्रपुनर्निर्माणाचा ध्यास घेतलेल्या 'भारत क्रांती मिशन'च्यावतीने आज १ जानेवारी २०२६ रोजी पांगरी (नाशिक) येथे 'क्रांती, संकल्प आणि शिवजागरणाचे महाअधिवेशन' आयोजित करण्यात आले आहे. २१ व्या शतकातील भारताच्या भावी वाटचालीची दिशा ठरणारे हे एक ऐतिहासिक आणि जागतिक व्यासपीठ ठरणार आहे. या महाअधिवेशनाचे मुख्य आकर्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील असणार आहे अशी माहिती भारत क्रांती मिशनचे अध्यक्ष डॉ. विलासभाऊ पांगारकर यांनी दिली.

मुंबई येथील मराठा आरक्षणाच्या यशस्वी लढ्यानंतर, संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांचा हा पहिलाच नाशिक जिल्हा दौरा आहे. या ऐतिहासिक सोहळ्यात ते उपस्थित जनसमुदायाला राष्ट्रहित आणि समाजहिताच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन करतील. 'छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्र गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात येणार आहे. देश-विदेशात शिवविचारांचा वारसा चालवणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात येणार आहे. शिल्पाताई कल्याण घुले (मराठा भूषण - अमेरिका), वृषाल खांडके (अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ - लंडन), सुनील पाटील (मराठा भूषण - सुरत, गुजरात), उत्तम मांढरे (मराठा भूषण - पुणे), सूर्यकांत दादा काकडे (यशस्वी उद्योजक - पुणे), राजुभाऊ चौधरी (शिवक्रांती प्रतिष्ठान - भिवंडी) यांचा सन्मान करण्यात येणार आहे. महाराष्ट्रासह देशभरात छत्रपती शिवाजी



महाराजांची राष्ट्रीय जयंती साजरी करणाऱ्या 'छावा भारत क्रांती मिशन'चा वर्धापन दिन आणि मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. पांगारकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा दुपारी १२:०० वाजता संपन्न होईल. अध्यात्म आणि राष्ट्र एकतेचा महाकुंभ या अधिवेशनास शिंदखेड राजाचे श्री शिवाजीराजे जाधव, माजी मंत्री आमदार माणिकराव कोकाटे आणि सिंहस्थ कुंभमेळ्याचे राष्ट्रीय प्रवक्ता महंत डॉ. भक्ती चरणदास महाराज, श्री श्री जगद्गुरु शांतीगिरीजी महाराज, जगद्गुरु द्वाराचार्य डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर यांसारख्या संतांची वंदनीय उपस्थिती लाभणार आहे.

**नव्या भारताचा रोडमॅप**

या महाअधिवेशनात सात मुख्य संकल्पांची घोषणा केली जाईल. राष्ट्र गौरव यात्रा : ९००० किमीची अभूतपूर्व देशव्यापी यात्रा, सत्य इतिहासाचा जागर : भारताचा खरा इतिहास जनसामान्यांपर्यंत नेणे, अखंड भारत संकल्प : सांस्कृतिक आणि वैचारिक स्तरावर देशाला जोडणे, रोजगार महासंकल्प : २५ लाख 'किसान ड्रोन'च्या माध्यमातून रोजगाराची निर्मिती, कृषी क्रांती : देशभरात १ लाख भारत किसान ड्रोन फ्री डिलरशिपचे उदिष्ट, आत्मनिर्भर भारत : युवकांना शिक्षण आणि उद्योगातून स्वावलंबी बनवणे, आंतरराष्ट्रीय शिवजन्मोत्सव : जगन्नाथपुरी २०२६ च्या भव्य नियोजनाची घोषणा होणार आहे.

**देशातील ९ राज्याचे प्रतिनिधी उपस्थित राहणार**

छत्रपती शिवरायांचे विचार जागतिक पातळीवर नेण्यासाठी १ जानेवारीपासून ही मोहीम सुरू होईल. याद्वारे १४० कोटी भारतीयांना जोडून एक नवा जागतिक विक्रम प्रस्थापित करण्याचा मानस मिशनने व्यक्त केला आहे. ९ राज्यांतून देशव्यापी सहभाग होईल. राजस्थान, हरियाणा, जम्मू-काश्मीर, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू या ९ राज्यांतील प्रतिनिधी या सोहळ्यासाठी उपस्थित राहणार आहेत. त्यासाठी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. विलासभाऊ पांगारकर, किशोरभाऊ चव्हाण, विजय काकडे पाटील, परमेश्वर नलावडे पाटील आणि समस्त पांगरी ग्रामस्थांनी सर्व राष्ट्रप्रेमी नागरिकांना या ऐतिहासिक सोहळ्यात लाखोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. संपर्क माहितीसाठी विजय काकडे पाटील : ८४११९४४००, आयोजक समस्त छावा, भारत क्रांती मिशन परिवार आणि आंतरराष्ट्रीय शिवजन्मोत्सव सोहळा समिती, जगन्नाथपुरी, ओडिसा यांना संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# शहरात नायलॉन मांजाची खुलेआम विक्री; विक्रेता जेरबंद

**नाशिक ।** शहरात मानवी जीवितास गंभीर धोका ठरणाऱ्या नायलॉन मांजाच्या अवैध विक्रीविरोधात गुन्हेशाखेने जोरदार कारवाई करत एका तरुणाला रंगेहाथ पकडले. गुन्हेशाखा युनिट २ च्या पथकाने मुंबईनाका परिसरात सापळा रचून नायलॉन मांजाचे तब्बल १०१ गट्टू (बॉबीन) हस्तगत केले असून त्याची किंमत १,०१,००० रुपये असल्याचे निष्पन्न झाले आहे. या कारवाईमुळे नायलॉन मांजाच्या गुप्त नेटवर्कला मोठा धक्का बसला आहे.

पोलीस आयुक्त, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी नायलॉन मांजाची साठवणूक, विक्री व वापर करणाऱ्यांविरुद्ध कठोर पावले उचलण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. त्या अनुषंगाने दिनांक




३०/१२/२०२५ रोजी गुन्हेशाखा युनिट २चे अधिकारी-अंमलदार माहिती संकलन करत असताना मुंबईनाका ते भारतनगर झोपडपट्टीकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर एका इसमाकडून नायलॉन मांजाची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार, फारूक जाफर मुलाणी (वय २२, रा. मुलतानपुरा, जुने नाशिक, भद्रकाली) हा इसम प्लास्टिकच्या गोणीत बंदी असलेला नायलॉन मांजा विक्रीसाठी बाळगत असल्याचे उघड झाले. प्रभारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पथकाने तात्काळ छापा टाकत सापळा रचला. कारवाईदरम्यान संशयितास ताब्यात घेऊन झडती घेतली असता मोनो KTC कंपनीचे विविध रंगांचे १०१ गट्टू (बॉबीन) नायलॉन मांजा मिळून आला. या प्रकरणी संबंधित अंमलदाराने दिलेल्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३, २९२, २९३, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ तसेच पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ मधील कलम ५ व १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त मुद्देमालासह आरोपीस पुढील तपासासाठी मुंबई नाका पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# निमाच्या अध्यक्षपदी आशिष नहार यांची फेरनिवड

## प्रमुख पाच पदाधिकाऱ्यांनाही पुन्हा संधी

**नाशिक ।** नाशिक इंडस्ट्रीज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा)च्या अध्यक्षपदी विद्यमान अध्यक्ष आशिष नहार यांची फेरनिवड करण्यात आली.

मंगळवारी (दि. ३०) सायंकाळी पाच वाजता सुरू झालेल्या निमाच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीत अवघ्या तीन मिनिटांत ही प्रक्रिया पूर्ण झाली. बैठकीत माजी अध्यक्षांनी विद्यमान पदाधिकाऱ्यांनीच पुन्हा जबाबदारी सांभाळावी, तसेच कार्यकारी समिती सदस्यांची निवडही त्यांच्याकडेच सोपवावी, अशी सूचना मांडली. सभागृहाने एकमुखाने या सूचनेला अनुमोदन देत निवडीवर शिक्कामोर्तब केले. या अविरोध निवडीत अध्यक्ष आशिष नहार यांच्यासह उपाध्यक्ष किशोर राठी व कमनीष रावल, सेक्रेटरी राजेंद्र अहीरे, खजिनदार राजेंद्र वडनेरे, तसेच किरण पाटील आणि कैलास आहेर यांचा समावेश आहे. संस्थेच्या १९८२ सालच्या घटनेनुसारच बैठकीचे कामकाज पार पडल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. अध्यक्ष नहार यांनी त्यांच्या अल्प कारकिर्दीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा आणि कामकाजाचा थोडक्यात आढावा सादर केला. यानंतर माजी अध्यक्ष विवेक गोगटे, रमेश वैश्य, डी. जी. जोशी आदींनी आपली मते व्यक्त करत विद्यमान पदाधिकाऱ्यांच्या फेरनिवडीला पाठिंबा दिला. दरम्यान, पुढील टप्प्यात विविध समित्यांच्या अध्यक्षपदी तसेच कार्यकारी समिती सदस्यपदी कोणाला संधी मिळते, याकडे उद्योगविश्वाचे लक्ष लागून राहिले आहे.

# आता लक्ष अर्ज माघारीकडे!

## नाशिक महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६



**नाशिक ।** नाशिक महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया मंगळवारी (दि.३०) संपली. आता साऱ्यांचे लक्ष वेधले आहे ते उमेदवारी अर्ज माघारीकडे. माघारीनंतर खऱ्या अर्थाने निवडणुकीत रंग भरणार आहे.

शुक्रवारी (दि. २ जानेवारी) उमेदवारी अर्ज माघार घेण्याची मुदत आहे. अर्ज छाननीमध्ये किती अर्ज बाद होतात याची नागरिकांना उत्सुकता आहे. त्याहीपेक्षा उत्सुकता लागली आहे ती यंदा नाशिक महापालिकेच्या निवडणुकीत किती अपक्ष उमेदवार नशीब अजमवितात याचे. त्या त्या राजकीय पक्षांनी तिकीट नाकारल्याने नाराज झालेल्या किती व कोणत्या इच्छुकांनी बंड करीत आपली उमेदवारी कायम ठेवली याचीही उत्सुकता न लागली तर नवलच! अर्ज दाखल करण्याचा अखेरच्या दिवशी एबी फॉर्मवरून भाजपसह सर्वच प्रमुख पक्षात घमासान झाले. त्यामुळे काही इच्छुकांनी बंडाचा झेंडा उभारत अपक्ष उमेदवारी केली तर काहींनी ऐन वेळी दुसरा पक्षाचा झेंडा हाती घेऊन त्या पक्षाचे उमेदवार म्हणून अर्ज दाखल करीत त्या त्या राजकीय पक्षांचा एबी फॉर्म अर्जासोबत जोडला.

महायुती फिस्कटल्याने यंदा भाजप स्वबळावर लढत आहे. भाजपने शंभर अधिकचा नारा देत त्यादृष्टीने वाटचाल कधीच सुरू केली होती. शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षाला फक्त अखेरपर्यंत झुलवत ठेवत महायुती महायुती अशी पोपटपंची सुरू ठेवली होती. अखेर भाजपने सन्मानपूर्वक तोडगा वा सुवर्णमध्य न काढता महायुतीला दूर ठेवत स्वतःचेच घोडे पुढे डामटले आहे. भाजपने सर्व १२२ जागांवर उमेदवार दिले असले तरी हे करताना अनेकांचा पत्ता कट केला तर अनेकांना पायघड्या टाकत उमेदवारीचे मानाचे पान दिले आहे.

अनेक निष्ठवंतांना पद्धतशीरपणे डावलत त्यांच्या हातात रेवड्या ठेवल्या आहेत. दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी, मनसे आणि कॉंग्रेसमध्येही थोड्याफार प्रमाणात हे प्रकार घडले असले तरी जास्त धग भाजपमध्ये जाणवली. उमेदवारी डावलल्याने कॉंग्रेसच्या निष्ठवंतांनी तर चक्क कॉंग्रेस कमिटी कार्यालयाला टाळे ठोकत आपल्या संतापला वाट मोकळी करून दिली.



# 'पुणे तेथे काय उणे'!

संपूर्ण देशात सत्तेच्या पाठीमागे धावणारे राजकारणी आपण पाहत आहोत. पण 'पुणे तेथे काय उणे' असे म्हटले जात असले, तरी पुण्यात मात्र माजी महापौर प्रशांत जगताप यांनी इतिहास घडविला. त्यांनी चक्क विकलांग झालेल्या काँग्रेसमध्ये प्रवेश करून खरोखरच विचारावर आधारित व तत्वावर आधारित पहिला राजकीय प्रवेश अलीकडच्या काळात करून दाखविला. कम्युनिस्ट विचारांचे लोक तत्व पाळतात, हे आपण पाहतोच. परंतु शरद पवार यांना खंबीर साथ देतानाच भाजपला साथ देणाऱ्या अजितदादा बरोबर जाणे पसंत नसल्याने शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून राजीनामा देऊन थेट काँग्रेसमध्ये प्रवेश करून त्यांनी तत्व व विचारावर आधारित कार्यकर्ता कसा असतो, हेच जणू महाराष्ट्राला दाखवून दिले. एका बाजूला सारेच राजकीय पक्ष सत्तेकडे फिरकत असताना त्याकडे पाठ करणारे प्रशांत जगताप यांच्यासारखा राजकारणी विरळाच म्हणावा लागेल. विचारांवर राजकारण कालही होत होतं. ते आजही होतंय आणि पुढेही होत राहील. निष्ठेला पायाखाली तुडवत सत्तेच्या परिघात नाचणारांची कितीही गर्दी झाली, तरी निष्ठेवर ठाम राहून आपले पाय तसूभरही थिरकू न देणारेही इथं भेटतील. म्हणूनच राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिला. का दिला? तर भाजपच्या वळचणीला गेलेले अजित पवार यांच्यासोबत पुणे महापालिकेत शरद पवारांचा राष्ट्रवादी युती करणार होती. ही गोष्ट विचारांच्या लढाईत योग्य नाही असं मत जगताप याचं होत. त्यांनी ते मत खा. सुप्रिया सुळे यांना बोलून दाखवलं. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर जगताप यांनी त्यांच्या पक्षाचा राजीनामा दिला. ते पुढे कुठल्यातरी सत्तेच्या मार्गावर जातील असे बोलले गेले, पण त्यांनी खरोखरच विचारावर आधारित प्रवेश करून अजूनही विचारांचे राजकारण जिवंत आहे याचा दाखला दिला. सगळे अधिकार स्थानिक नेत्यांना दिलेत, असे खा. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. याचा अर्थ पुण्यातील निर्णय स्थानिक नेत्यांनी घेतला असा होतो. जर तसे असेल तर शहराध्यक्ष म्हणून सर्व अधिकार प्रशांत जगताप यांनाच असणार ना? मग जगताप यांना वाटलं अजित पवारांसोबत नाही जायचं, त्यांनी त्यांचा निर्णय सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांना कळवळा असेल. त्यानंतर त्यांचा निर्णय मान्य करायचं तर सोडाच, याउलट त्यांना त्यांच्याच पक्षकडून 'विचार' ऐकावे लागले असतील. मग सहज प्रश्न पडतो की, शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांचे विचार पुरोगामी असले तरी त्यांचा पक्ष पुरोगामी कसा होऊ शकतो? प्रशांत जगताप यांच्यासारख्या नेत्याची आयुष्यातली २५ वर्षे एका विचारांवर, विवेकावर आणि नेत्याच्या शब्दावर खर्ची पडली आहे. कधीही पक्ष बदल करण्याचा मोह त्यांना आजपर्यंत झाला नाही. त्यांचा इतिहास लोकांना माहीत असल्यामुळे ते आमदार व पुण्याचे महापौर देखील झाले. एका कार्यकत्यार्ला वाटणार मत त्यांनी पक्षाच्या वरिष्ठांकड मांडूनही उपयोग होत नसेल तर 'त्या' पक्षात ते थांबतीलच कसे?

राष्ट्रवादी हे आमचं कुटुंब आहे, असं पक्षाकडून सांगितले जाते. म्हणजे एकीकडं कुटुंब म्हणायचं आणि कुणीतरी तत्वावर, विचारांवर बोट ठेऊन रागावले कींवा त्यांची भूमिका मांडली तर त्याला 'हे काही घर नाही' म्हणून बाजूला सारायचं.

सगळ्यात लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, २५ वर्ष पक्षाशी, शरद पवारांशी आणि विचारांशी प्रामाणिक असलेला कार्यकर्ता पक्ष सोडून जाण्याची भूमिका का घेतो याचा विचार करण्याची गरज होती. अनेकांना वाटत शरद पवार पुरोगामी विचारांचे आहेत. पण पुरोगामीपणाची शाल पांघरून राजकारण करणारे खतरनाक असतात. कारण शरद पवारांच्या राजकारणाची सुरुवातच मुळात भाजपला सोबत घेऊन झालेली आहे.

चेहरा पुरोगामीचा पण कृती मात्र प्रतिगामींची हे अनेकदा सिद्ध झाले आहे. वसंतदादा पाटील यांचं सरकार पाडून 'पुलोद'चा प्रयोग करतांना जनसंघाला सोबत घेऊनच झाला. त्यावेळी संघ विचारांचे लोक पवारांच्या मंत्रिमंडळात होतेच. उत्तमराव पाटील, हशू अडवाणी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट्टर कार्यकर्ते होते. त्यांना पहिल्यांदा मंत्री कुणी केलं तर स्वतःला पुरोगामी म्हणणाऱ्या शरद पवारांनीच.

सरकार कुणाचं पाडलं तर एका अस्सल पुरोगामी विचारांच्या वसंतदादा पाटलांचं. म्हणजे, सत्तेची आणि लवकरात लवकर मुख्यमंत्री होण्याची



पवारांची घाई आता लक्षात घेतली पाहिजे. हा सर्व प्रकार पवारांनी तारूण्यात असतांना केला होता. ज्यांच्या राजकारणाची सुरुवातच अशी झाली असेल तर त्याचा पुढचा अंक कसा असेल याचा अंदाज केलेलाच बरा.

कॉंग्रेसच्या विरोधात पुलोद म्हणून निवडणूक लढवली त्यामध्येही भाजप होती. कॉंग्रेस त्यावेळी जिंकली, पण तेव्हाही पवारांनी पुरोगामी नावच वापरले. भाजपलाही अशावेळी कुणीही पुरेगामी चालतो. शरद पवार अनेकदा त्यांच्या बरोबर राहिले आहेत.

थर्ड अम्पायर
जयंत महाजन
९४२०६११४२०

आता तर महाराष्ट्रात तसं काही राहिलंच नाही. कोणत्या विचारसरणीचे लोक कोणाबरोबर जातात, याचा भाजपच्याही लोकांना अंदाज नाही. विचारांवर निवडणुका लढणाऱ्या कार्यकर्त्यांवर हे घावच असतात. प्रशांत जगताप यांनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश करताना आपली भूमिका स्पष्ट केली.

ते म्हणाले की, 'ज्या कॉंग्रेस पक्षाला शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आहे. तसंच गांधी आणि नेहरुंची विचारधारा आहे. त्या पक्षात मी सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काळात पुण्यामध्ये कॉंग्रेसला पुन्हा एक नंबरला आणून महाराष्ट्रात आणि पुण्यात भाजपनं जे काही लुटलेलं आहे त्याला विरोध करणारा प्रमुख पक्ष म्हणून कॉंग्रेस कसा उभा राहील यासाठी मी प्रयत्न करेन'. आता अशा व्यक्तीला पाठिंबा देण्याऐवजी त्यांना चार गोष्टी सुनावण्याचा कॉंग्रेसचा प्रकार पाहिल्यावर कॉंग्रेसची बुडती नाव लवकर वर येईल, असे वाटत नाही.

### कॉंग्रेस पक्ष सुधारणार तरी कधी?

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष राहिलेले प्रशांत जगताप यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करताच पुणे काँग्रेसमधील काही नेत्यांना ते अडचणीचे वाटू लागले. त्यामुळं उघडपणे जगताप यांच्याविरोधात काँग्रेसच्या नेत्यांनी भूमिका घेत त्यांच्या पक्ष प्रवेशाचं स्वागत केलं असलं तरी काहीसा विरोधाचाही सूर लावला. आपल्या नाराजी मागचं कारणही या नेत्यांनी स्पष्ट केलं आहे. काय तर म्हणे प्रदेश काँग्रेसकडून शहरातील काँग्रेस नेत्यांना विश्वासात घेतलं गेलं नाही, पक्ष प्रवेशाच्या प्रक्रिया डावलत प्रशांत जगताप यांना प्रवेश दिल्याचा आरोप काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी केला. त्याचबरोबर जगताप यांनी आतातायीपणे काँग्रेसमध्ये निर्णय घेऊ नये, अशा शब्दांत घरचा आहेरही त्यांनी दिला आहे. प्रशांत जगताप यांनी ज्या पद्धतीने राष्ट्रवादी पक्षाचे पद सोडले, त्याचे त्यांच्या पक्षाऐवजी काँग्रेसलाच अप्रूप वाटले. ज्या आततायी पद्धतीनं त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचं शहराध्यक्षपद सोडलं ते योग्य नाही, असे काँग्रेसवालेच म्हणू लागले. जर एखाद्या पक्षाला निर्णय सांगण्यात आपण अपयशी ठरलो, तर लगेच एखादी टोकाची भूमिका घ्यायची नसते. आपल्यामध्ये कला असली पाहिजे आपल्या नेत्याचं मन वळवण्याची. जर ती आपल्यात नसेल आणि जर आपण आतातायीपणानं निर्णय घेतला तर तुम्ही कोणत्याही पक्षात गेलात तर ते अडचणीचच होणार, अशा शब्दांत स्थानिक नेते अरविंद शिंदे यांनी प्रशांत जगताप यांच्या काँग्रेस प्रवेशावर भूमिका मांडली. ज्या पक्षाचे देशभर पानिपत होत आहे, त्या पक्षात कुणीतरी येत आहे, त्याचे स्वागत करण्याऐवजी अपशकुन करण्याचा प्रकार पाहिल्यावर काँग्रेस पक्ष सुधारणार तरी कधी? असा प्रश्न सहज पडतो.

# सत्तेसाठी पक्षनिष्ठेचा खेळखंडोबा

मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका यंदा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तेसाठी मर्यादित राहिलेल्या नाहीत. या निवडणुकांनी महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवे, अस्वस्थ करणारे वास्तव समोर आणले आहे, ते म्हणजे पक्षनिष्ठेचे झिजलेले स्थान आणि जिंकण्याच्या हमीने व्यापलेली राजकीय मानसिकता.

राज्याच्या इतिहासात प्रथमच महापालिका निवडणुकांना इतके राजकीय वजन आले आहे की, या लढतींनी थेट पक्षसंघटनांची ताकद, नेतृत्वाचा आत्मविश्वास आणि विचारधारेची शाश्वतता प्रश्नांकित केली आहे.

यंदाच्या निवडणुकांमध्ये जे घडले, ते अभूतपूर्व आहे. बंडखोरीच्या भीतीने सर्वच पक्षांनी उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्याऐवजी थेट एबी फॉर्म देण्याचा मार्ग स्वीकारला. बंद दरवाजामागे उमेदवारी ठरवणे, शेवटच्या क्षणापर्यंत नावं गुप्त ठेवणे हे सारे प्रकार केवळ तांत्रिक नव्हे, तर राजकीय अविश्वासाचे लक्षण आहेत. लोकशाहीत उमेदवार निवडण्यापेक्षा उमेदवार रोखणे अधिक महत्त्वाचे ठरू लागले, ही बाब चिंताजनक आहे.

पक्षप्रमुखांनी स्वीकारलेली ही पद्धत एक स्पष्ट संदेश देते–पक्षाला आता स्वतःच्या माणसांवरही पूर्ण विश्वास उरलेला नाही. तिकीट न मिळाल्यास हा बंड करेल का?, हा खरंच निवडून येईल का? या दोन प्रश्नांनी पक्षनेतृत्वाला ग्रासले आहे. यातून उमेदवाराची निष्ठा नव्हे, तर त्याची विनयशीलता आणि धोका न निर्माण करण्याची क्षमता अधिक महत्त्वाची ठरते आहे. परिणामी, राजकारणात विचारधारेपेक्षा अंकगणिताला अग्रक्रम मिळतो आहे.

या प्रक्रियेत सर्वाधिक नुकसान झाले आहे ते निष्ठावंत कार्यकर्त्यांचे. वर्षानुवर्षे संघटन बांधणारे, पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात पुढे असणारे, मतदारांशी रोजचा संबंध ठेवणारे कार्यकर्ते अनेक ठिकाणी डावलले गेले.

त्यांच्या जागी जिंकू शकतो या एकमेव निकषावर चेहरे निवडले गेले. ही निवडणूक जिंकण्याची शहाणपणाची रणनीती असू शकते, पण पक्षसंघटनेच्या दीर्घकालीन आरोग्यासाठी ती घातक ठरते.

अधिक गंभीर बाब म्हणजे, सत्तेत असलेल्या पक्षांनाही उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्याचे धाडस झाले नाही. सत्ता हातात असूनही जर नेतृत्वाला स्वतःच्या संघटनेवर विश्वास ठेवता येत नसेल, तर ती सत्ता नेमकी कशावर उभी आहे, हा प्रश्न उभा राहतो. संघटनेची मुळे खोलवर रुजलेली असतील, तर अशा गुप्त, तातडीच्या आणि भयग्रस्त निर्णयांची गरजच भासत नाही.



दिपक कैतके
मुंबई.

यंदाच्या निवडणुकांनी स्पष्टपणे दाखवून दिले आहे की निष्ठा हरली आणि अंकगणित जिंकलं. निष्ठा, विचारधारा, पक्षासाठीची तपश्चर्या या संकल्पनांना आजच्या राजकारणात दुय्यम स्थान मिळाले आहे. त्याऐवजी विनाबंडखोरी, विनाधोका आणि जिंकण्याची शक्यता, हाच निकष उरला आहे. परिणामी, बंडखोरी वाढली, पक्षांतरांचे राजकारण वेग घेतले आणि स्थानिक पातळीवर संधीसाधूपणाला खतपाणी मिळाले.

ही लढत आता केवळ प्रभाग किंवा वॉर्ड जिंकण्यापुरती उरलेली नाही. ही निवडणूक पक्षीय आत्मविश्वासाची, संघटनात्मक टिकावाची आणि लोकशाही मूल्यांची कसोटी बनली आहे. आज बंडखोरी टाळण्यासाठी केलेल्या तडजोडी उद्या संघटना पोखरण्याचे कारण ठरू शकतात, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

शेवटी प्रश्न उरतो तो मूलभूत, पक्ष टिकवायचा की सत्ता मिळवायची? सत्ता मिळवण्यासाठी जर पक्षनिष्ठेलाच किंमत उरणार नसेल, तर उद्याच्या राजकारणात पक्षसंघटनांचा पाया नेमका कशावर उभा राहणार? निवडणुकांचे निकाल काही दिवसांत लागतील आणि कोण जिंकले-हरले याचा तात्कालिक हिशेब मांडला जाईल. मात्र यंदाच्या महापालिका निवडणुकांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला दिलेला धक्का दीर्घकाळ जाणवणार आहे.

कारण यंदा लढत केवळ सत्तेसाठीची नाही, ती पक्षनिष्ठा आणि सत्तेच्या हव्यासातील संघर्षाची आहे आणि या संघर्षात सत्ता जिंकली जाऊ शकते, पण विश्वास हरवला तर राजकारणाचे भवितव्यच धोक्यात येते.... हा इशारा यंदाच्या निवडणुकांनी स्पष्टपणे दिला आहे.

# देशपातळीवर खेळाडू घडविणारे क्रीडा प्रशिक्षक सचिन कांबळे

देशामध्ये पालकांची खेळाप्रती असलेली उदासीनता आणि पाल्यांना मिळणारे अपुरे प्रोत्साहन अशा सामाजिक पार्श्वभूमीवर हॉकी या खेळाविषयी गोडी निर्माण करून त्याच्या प्रचार व प्रसारात मोठे योगदान देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राष्ट्रीय पातळीवर हॉकी स्पर्धेत तीन वेळा सहभागी झालेले क्रीडा शिक्षक सचिन कांबळे यांनी केले आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात शेकडो खेळाडूंना राज्य पातळीवर, देश पातळीवर खेळविले आहे, त्यांना यश संपादन करून दिले आहे. आज राज्यातल्या टॉप असणाऱ्या दहा क्रीडा शिक्षकांमध्ये कांबळे सर यांचे अव्वल स्थान आहे.

--------------------

वडील पोलिस खात्यात असल्याने चार ऑलिंपिक आणि चार विश्वचषक जिंकलेले धनराज पिल्ले जिथून घडले, अशा पुण्यातील खडकी या गावाशी त्यांचा संपर्क आला. हॉकीचे माहेरघर असलेल्या या गावात अनेक हॉकी खेळाडू घडत होते. या पोषक वातावरणाचा सचिन कांबळे यांच्यावर प्रभाव पडला आणि त्यांच्यात या खेळाविषयी आकर्षण निर्माण झाले. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षीच त्यांनी या खेळात आयुष्य घडविण्याचे ठरविले.

भारतीय संघात खेळण्याचे स्वप्न बाळगून सचिन यांनी या खेळासाठी आवश्यक सर्व नैपुण्य आत्मसात करत कठोर मेहनत घेत १८ वर्षांखालील पुणे विद्यापीठाची देशपातळीवरील पहिली स्पर्धा जिंकली. अशा तऱ्हेने त्यांच्या कारकिर्दीची यशस्वी घोडदौड सुरू झाली.

मात्र, हा प्रवास सुरू करताना आलेला एक कटू अनुभव ते सांगतात. १४ वर्षांखालील बेंगळुरू नॅशनल हॉकी स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली होती. त्यासाठी ते रोज ४ ते ५ किलोमीटर धावायचे. खेळाचा आवश्यक अभ्यास करून त्यांनी कौशल्य प्राप्त केले होते.

पण ऐनवेळी राजकीय दबावातून त्यांचे नाव रद्द करण्यात आले. ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली. त्यांच्या आईनेही खेळ सोडून अभ्यासाकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला. मात्र या खेळालाच वाहून घेण्याचा त्यांचा निर्णय ठाम होता. आज १६ ते १७ वर्षांपासून ते क्रीडा क्षेत्रात कार्यरत असून आपल्या कारकिर्दीत ते राष्ट्रीय पातळीवर तीन वेळा, तर विद्यापीठ स्पर्धांमध्ये दोन वेळा सहभागी झाले आहेत. हॉकी महाराष्ट्र असोसिएशनमध्ये त्यांनी राष्ट्रीय पंच म्हणून बारा वर्षे सेवा दिली असून सातारा जिल्हा क्रीडा विभागातही त्यांचा सहभाग आहे.

खेळासाठी संघर्ष करत असताना खेळाडूंची परिस्थिती त्यांनी जवळून अनुभवली होती. विद्यार्थ्यांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते, याची त्यांना जाणीव होती. यातूनच उदयन्मुख खेळाडूंसाठी आपले काही देणे लागते, या प्रेरणेतून आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी त्यांनी बी.पी.एड. पूर्ण केले. पुण्यातील सैनिक शाळेपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास अखंडपणे पाचगणी येथील संजीवन विद्यालयात क्रीडा शिक्षक म्हणून सुरू आहे.

संजीवन विद्यालय ट्रस्टच्या अध्यक्ष शालिनीताई या आज वयाच्या ९३ व्या वर्षीही अपार उत्साहाने या संस्थेच्या अध्यक्षपदावर कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातून आणि प्रोत्साहनातून शाळेच्या निसर्गरम्य २२ एकर कॅम्पसमध्ये आठ एकर फुटबॉल व हॉकी मैदान, ४०० मीटर अथलेटिक्स ट्रॅक, ६०० मीटर नैसर्गिक ट्रेक, २५ मीटर स्विमिंग पूल, क्रिकेट मैदान, नेट प्रॅक्टिस क्षेत्र, जिम, बास्केटबॉल आर्टिफिशियल कोर्ट, चारशे लोकांसाठी क्रीडा वसतिगृह अशी सुसज्ज आणि पोषक क्रीडा सुविधा उभारण्यात आली आहे.

आपल्या शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध शिकवणुकीतून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नैपुण्यसमृद्धता निर्माण केली असून जिंकण्याची मनोवृत्ती रुजवली आहे. त्यांच्या या समर्पणातून १६ ते २० खेळाडू राष्ट्रीय पातळीवर व ३०० ते ३५० विद्यार्थी राज्य पातळीवर खेळले आहेत.



माणूसपणाची पाऊलवाट
सुजाता बंडावार

अक्षय कुमारच्या गोल्ड चित्रपटात त्यांचे दोन विद्यार्थी झळकल्याची गोष्ट ते अभिमानाने सांगतात. खेळात आवड असलेल्या ३५ ते ४० वयोगटातील ज्येष्ठ क्रीडाप्रेमींसाठी ते स्पर्धांचे आयोजन करतात. विभागीय, राज्य आणि शासनस्तरीय स्पर्धांमध्ये ते पंच म्हणूनही कार्य करतात.

त्यांच्या या मेहनतीची पावती म्हणून २००८ साली त्यांना लोकसेवा क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००५ साली ऑल इंडिया विद्यापीठ हॉकी स्पर्धा आणि २००४ साली कुमार गट राष्ट्रीय स्पर्धा त्यांनी जिंकल्या आहेत. एनसीसी अधिकारी म्हणूनही ते कार्यरत आहेत. सचिन सर यांनी देशभरात शेकडो विद्यार्थी घडवले आहेत, ते खेळासोबत सर्वांनी प्रेमाने नाते जोडावे असे सांगितले आहे.

सचिन सर म्हणतात, खेळाविषयी पालकांमध्ये असलेली उदासीनता आता कमी होत आहे. शासन पातळीवर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रावीण्य मिळविणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये थेट नियुक्ती मिळत आहे.

ते अंतःकरणातून सांगतात की प्रत्येक खेळाडूचा पहिला गुरु हा त्याच्या शाळेतील क्रीडा शिक्षक असतो. या क्रीडा शिक्षकाने मिळणाऱ्या पगाराच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांमधील खेळ कौशल्य ओळखून त्याला घडविण्यासाठी अपार मेहनत घेतली पाहिजे.



खेळामध्ये शारीरिक सुदृढतेसोबतच मजबूत मानसिकता निर्माण करण्याची गरज आहे. कारण येथे मिळणारे यश सहज नसते. अपयश आले तरी खेळ संपत नाही आणि आयुष्य थांबत नाही, हे विद्यार्थ्यांच्या मनात रुजवून आत्महत्येसारख्या विचारांपासून त्यांना परावृत्त केले पाहिजे. आज खेळाला चांगले दिवस आले असले तरी खेळ संघटना आणि होतकरू विद्यार्थ्यांना सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळण्याची गरज आहे.

देश व राज्य पातळीवर खेळण्यासाठी तयार असलेल्या विद्यार्थ्यांना त्या त्या मैदानांशी जुळवून घेण्यासाठी दीड ते दोन महिने निवासी सरावाची सुविधा द्यायला हवी. गल्लीबोळीत खेळला जाणारा क्रिकेट जसा सर्वांना उमगला, तसाच हॉकी खेळ गाव पातळीवर पोहोचण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये मैदाने तयार झाली पाहिजेत.

ज्या खेळामुळे मला अर्थसहाय्य मिळाले आणि आज माझे घर चालते, त्या खेळाप्रती कृतज्ञता व्यक्त करत ते सांगतात की लवकर निवृत्ती घेऊन होतकरू विद्यार्थ्यांसाठी पूर्णवेळ कार्य करायचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळाची महत्त्वाची भूमिका असून खेळामुळे त्यांच्यात जिद्द, आत्मविश्वास आणि खिलाडूवृत्ती निर्माण होते. त्यामुळे पालकांनी अभ्यासासोबतच खेळालाही महत्त्व द्यावे, असे आवाहन सचिन सर यांनी केले आहे. त्यांचा खेळाडू घडविण्याचा हा प्रवास असाच अखंडपणे सुरू राहो, यासाठी आमच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**सचिन कांबळे संपर्क क्र. 9860164066**

# नव्या वर्षासाठी नवा संकल्प!

सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नववर्षाचे स्वागत करताना आपल्यापैकी अनेक जण आत्मचिंतन करतात. सरत्या वर्षासाठी आपण कोणकोणते संकल्प केले होते, त्यापैकी किती पूर्ण झाले आणि किती शेष आहेत, केलेले संकल्प पूर्ण न होण्यामागे नक्की कोणकोणते अडथळे आले आणि त्यासोबतच येणाऱ्या वर्षात आपल्याला कोणकोणती शिखरे किती काळात गाठायची आहेत, अडचणींवर कशाप्रकारे मात करायची आहे याचे गणित मांडतात.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

हे संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याला काय काय प्रयत्न करावे लागणार आहेत याची जंत्री बनवतात. प्रतिवर्षी केले जाणारे हे संकल्प बऱ्याचदा व्यावहारिक स्वरूपाचे असतात. विद्यार्थी एखादी परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याचा संकल्प करतात, व्यावसायिक आपल्या व्यवसायात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्याचा, व्यवसाय वाढवण्याचा संकल्प करतात, कार्यालयीन कर्मचारी कार्यालयात प्रमोशन आणि वेतनवृद्धी मिळवण्याच्या दृष्टीने संकल्प करून त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची सूची बनवतात, नवीन गाडी, घर किंवा एखादी महागडी वस्तू विकत घेण्याचा संकल्प करतात, स्त्रीवर्ग येत्या वर्षात नवीन दागिना, वस्तू विकत घेण्याचा, पैसे बचतीचा संकल्प करतात. दरवर्षी केले जाणारे हे संकल्प पुढील काही दिवस आपल्या प्रयत्नांना ऊर्जा देण्याचे कार्य करतात.

आपल्यापैकी किती जण वर्षाअखेरीस आपल्यात असलेल्या आणि वर्षभरात वाढलेल्या दोषांचे चिंतन करतात आणि हे दोष घालवण्यासाठी, आपल्यात नसलेले गुण आणण्यासाठी आणि अल्प प्रमाणात असलेल्या गुणांच्या वृद्धीसाठी प्रयत्न करतात? आपल्यामध्ये अनेक दोष आहेत. यामुळे अनेकदा नुकसान होते, चुकीचे निर्णय घेतले जातात. मात्र या दोषांची सूची बनवून येणाऱ्या वर्षात हे दोष कमी करण्यासाठी आणि सोबत आपल्यात नवनवीन गुण आणण्याच्या दृष्टीने आपण संकल्प करतो का?

यंदा असा संकल्पही करून पाहूया. दोषासोबत आपल्याला असलेला चुकीच्या सवयी, व्यसने यांची सूची बनवूया आणि त्यासाठी कोणकोणते प्रयत्न करायला हवेत, कोणाकोणाचे साहाय्य घ्यायला हवे हेही लिहून काढू.

आपले शारिरिक आणि मानसिक आरोग्य हे सर्वस्वी समाजावर अवलंबून आहे. त्यामुळे तो निरोगी, सुदृढ आणि सशक्त असणेही तितकेच महत्वाचे आहे.

भ्रष्टाचार, गुंडगिरी, स्त्रियांवरील अत्याचार, लहान मुलांचे शोषण, जातीपातीतील तंटे, तरुणांमधील व्यसनाधीनता, प्रमुख शहरांना पडत चाललेला अमली पदार्थांचा विळखा, ऑनलाईन गेमिंग ॲप्सना बळी पडत चाललेली तरुणाई, टीव्ही आणि गेम्स आदींच्या नादात लहान मुलांचे हरवत चाललेले बालपण, फास्ट फूड-जंक फूड आदींच्या आहारी गेल्यामुळे वाढत चाललेली आजारपणे, भाज्या-फळे, धान्य, दूध आणि दुग्धजन्य उत्पादने यांमधील भेसळ, अन्नपदार्थांत वाढत चाललेला रसायनांचा वापर, बनावट औषधाचे वाढते स्तोम, घरभेदी सिरीयल्स, अश्लील-हिंसक वेबसिरीज आणि चित्रपट, मोबाईल मध्ये गुंतत चाललेले जीवन या सर्वांचा परिणाम म्हणून हरवत चाललेला सुसंवाद, पसरत चाललेली विश्वासघातकी वृत्ती यांसारख्या अनेक समस्या भेडसावत आहेत.

यासाठी राजकीय मंडळी किंवा सरकार काही करेल ही अपेक्षा करण्यापेक्षा या सर्वांच्या निर्मूलनासाठी मीं काय करू शकतो याचा विचार सरत्या वर्षाला निरोप देताना प्रत्येकाने करायला हवा.

### माणसाच्या निष्काळजीपणाचे भयावह दर्शन

वाचक लिहितात

नाणूस, वाळपई येथील जय श्रीराम अखिल गोमंतक गोसंवर्धन केंद्रात घडलेली घटना अंतर्मुख करणारी आहे. एका गायीच्या पोटातून तब्बल ४८ किलो ३०० ग्रॅम प्लास्टिक, पीव्हीसी पाईपचे तुकडे, चामड्याचा पट्टा, जुने रेनकोट, कापड, नायलॉन दोऱ्या व धातूची वायर शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आली. गोव्यातील अशा प्रकारची ही पहिलीच विक्रमी शस्त्रक्रिया मानली जात आहे. रस्त्यावर टाकलेला कचरा, विशेषतः प्लास्टिकमध्ये गुंडाळलेले अन्न, गायी नकळत खातात आणि त्याचे दुष्परिणाम त्यांच्या जीवावर बेततात, याचे हे जिवंत उदाहरण आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे गायीचा जीव वाचला असला, तरी मानवी निष्काळजीपणा आणि प्लास्टिक कचऱ्याचे वाढते संकट यावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

ही घटना केवळ एका गायीपुरती मर्यादित नसून, पर्यावरण संरक्षण, कचरा व्यवस्थापन आणि मूक प्राण्यांबद्दलची आपली जबाबदारी याची जाणीव करून देणारी आहे. रस्त्यावर कचरा टाकणे थांबवणे आणि प्लास्टिकचा वापर कमी करणे, हाच अशा दुर्दैवी घटनांना आळा घालण्याचा खरा मार्ग आहे.

■ सौ.रमा देशमुख, नागपूर.

# भिजवलेल्या तांदळाचे आरोग्यदायी फायदे



तांदूळ हे भारतीय खाद्य पदार्थातील मुख्य अन्न आहे. अनेकांना तर भाताशिवाय पोटही नसते. आपल्या आहारात तांदूळ खूप महत्त्वाचा आहे, डोसापासून रात्रीच्या जेवणापर्यंत भात आवश्यक झाला आहे.

तथापि, आजच्या काळात लोक जास्त घाईत आहेत आणि तांदूळ व्यवस्थित शिजवत नाहीत, ज्यामुळे तांदळाच्या फायद्याऐवजी शरीराचे नुकसान होऊ लागते. आपले पूर्वज स्वयंपाक करण्यापूर्वी काही काळ तांदूळ पाण्यात भिजत असत. ही केवळ चव किंवा सवयीची बाब नाही, तर हा एक स्वस्थ मार्ग आहे. आजच्या काळात अनेकांना तांदूळ धुण्याची आणि थेट शिजवण्याची घाई असते, परंतु तांदूळ पाण्यात भिजवण्यामागे अनेक गुणधर्म लपलेले असतात.

भातामध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण भरपूर असते, जे शरीराला झटपट ऊर्जा पुरवण्याचे काम करते. विशेषतः शारीरिक श्रम करणाऱ्या लोकांसाठी भात हा ऊर्जेचा मुख्य स्रोत आहे. तांदूळ हा नैसर्गिकरित्या ग्लूटेन-मुक्त असतो, त्यामुळे ज्यांना गव्हाची किंवा ग्लूटेनची ॲलर्जी आहे, त्यांच्यासाठी भात हा एक सुरक्षित आणि उत्तम पर्याय ठरतो. ब्राऊन राइस आणि हातसडीचा तांदूळ हे सर्वात फायदेशीर मानले जातात.

तांदळावर जास्त प्रक्रिया केल्यामुळे त्यातील पोषक घटक आणि फायबर निघून जातात. ब्राऊन राइसवर प्रक्रिया कमी केलेली असते, यामध्ये फायबरचे प्रमाण भरपूर असते, जे पचनक्रिया सुधारण्यास आणि बद्धकोष्ठतेचा त्रास कमी करण्यास मदत करते.

भात पचायला हलका असतो, त्यामुळे पोटाच्या तक्रारी किंवा आजारपणात डॉक्टर भात खाण्याचा सल्ला देतात. भातामधील पोषक घटक पचनसंस्था सुरळीत ठेवण्यास मदत करतात.

भातामध्ये कोलेस्टेरॉल, सोडियम आणि फॅट्सचे प्रमाण नगण्य असते, ज्यामुळे तो हृदयाच्या आरोग्यासाठी पोषक ठरतो. ब्राऊन राइस किंवा हातसडीचा तांदूळ यामध्ये फायबर आणि जीवनसत्त्वे मुबलक प्रमाणात असतात, जे वजन नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तातील साखर संतुलित राखण्यास मदत करतात.

योग्य प्रमाणात आणि योग्य वेळेत भाताचे सेवन केल्यास शरीराची चयापचय क्रिया सुधारते. तांदूळ पाण्यात भिजवून ठेवल्याने त्यात असलेल्या फायटिक ॲसिडची पातळी कमी होते. हे फायटिक ॲसिड शरीराला लोह, कॅल्शियम आणि जस्त सारख्या आवश्यक खनिजे शोषून घेण्यापासून प्रतिबंधित करते. भिजवण्याने हा अडथळा काही प्रमाणात कमी होतो.

■ ■ ■

### अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



**नववर्ष स्वागतम्..!**

रचाया उज्वल
भविष्याचा पाया
विचारांती दुरदृष्टीचे
संकल्प करू या ...!

संकल्पांना दिली, जिद्दीने
निरंतर प्रयत्नांची साथ
तर स्वप्नपुर्तीचा आनंद
मावणार नाही गगणात..!

प्रयत्नांती परमेश्वर
हे तत्व ठेवावे ध्यानी
आज नाही तर उद्या यश
मिळेल चिंता नको मनी..

# अंतर्गत द्वेषातून महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांचा छळ

## अंजनेरी प्राथमिक आरोग्य केंद्रात गंभीर प्रकार



**नाशिक ।** जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अंजनेरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या सेवाजेष्ठ महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांना गेल्या काही काळापासून अंतर्गत द्वेष, वैयक्तिक आकस आणि प्रशासकीय अडथळ्यांचा सामना करावा लागत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे.

डॉ. रेखा सोनवणे (गट-अ, एमबीबीएस) या मागासवर्गीय महिला वैद्यकीय अधिकारी असून त्या गेल्या २३ वर्षांपासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत. सध्या त्या प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनेरी, ता. त्र्यंबकेश्वर येथे प्रभारी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. या आरोग्य केंद्रातील बहुतांश कर्मचारी खाजगी संस्थेमार्फत कंत्राटी स्वरूपात नियुक्त असल्याने प्रशासकीय कामकाजात अडचणी निर्माण होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, एका कर्मचाऱ्याच्या पत्नीची पूर्वी संगणक ज्ञानाअभावी नियुक्ती रद्द करण्यात आली होती. त्याच कारणावरून वैयक्तिक रागातून वाहनचालक व त्यांच्या पत्नीने महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांशी वारंवार वाद घालणे, कामात अडथळे आणणे, तसेच कार्यालयीन कामकाज जाणीवपूर्वक टाळणे सुरू केल्याचा आरोप आहे. परिणामी मातृत्व अनुदान, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया लाभार्थी यांसारखी महत्त्वाची कामे रखडली असून लाभार्थ्यांना वेळेवर लाभ मिळालेला नाही. या प्रकाराला विरोध करताना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वरिष्ठ कार्यालयांकडे पत्रव्यवहार केला असता, त्याचा वैयक्तिक सूड उगवण्याच्या उद्देशाने धमकावणे, वाद घालणे, व्हिडिओ चित्रीकरण करून बदनामी करण्याचे प्रयत्न झाल्याचेही तक्रारीत नमूद आहे. इतकेच नव्हे तर बनावट नावे वापरून चारित्र्यहनन करणारी लेखी तक्रार वरिष्ठ कार्यालयांकडे देण्यात आल्याचेही उघड झाले आहे. स्थानिक पातळीवर राजकीय दबाव टाकून बनावट पत्र तयार करून बदलीसाठी सह्या गोळा करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. प्रत्यक्षात, महिला वैद्यकीय अधिकारी दररोज आधार-आधारित प्रणालीवर उपस्थिती नोंदवत असून त्या मुख्यालयी वास्तव्यास आहेत, असे उपस्थितीचे पुरावे सादर करण्यात आले आहेत. रात्री-अपरात्री आपत्कालीन प्रसूती, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया आणि गंभीर रुग्णसेवा देऊनही वैयक्तिक द्वेषातून छळ सुरू असल्याने आरोग्य केंद्रात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे स्वतःच्या सुरक्षेबाबत तसेच कुटुंबाच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या सर्व प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी, तसेच सेवाजेष्ठ महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांना संरक्षण व न्याय द्यावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. अन्यथा भविष्यात कोणतीही महिला वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहून निष्ठेने सेवा देण्यास धजावणार नाही, असा इशाराही या प्रकरणातून व्यक्त होत आहे.

### अंजनेरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या बदलीची ग्रामस्थांची मागणी

**नाशिक ।** अंजनेरी (ता. त्र्यंबकेश्वर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनेरी येथे कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रेखा सोनवणे यांच्या बदलीची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात समस्त ग्रामस्थांनी पंचायत समिती त्र्यंबकेश्वर येथील आरोग्य अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन दिले आहे.

निवेदनात गेल्या पाच वर्षांपासून डॉ. सोनवणे या सतत गैरहजर राहत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ग्रामस्थांनी विचारणा केल्यास अरेरावीची भाषा व उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून तात्काळ बदली न केल्यास ग्रामस्थ आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबतील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# कंपनी मालकाला जिवे ठार मारण्याची धमकी देत खंडणी; संतोष शर्मावर आणखी एक गुन्हा दाखल



**नाशिक ।** सातपूर औद्योगिक वसाहतीत पुन्हा एकदा खंडणीखोरांचा धुडगूस उघडकीस आला असून, कंपनीमालकाला जिवे ठार मारण्याची धमकी देत तीन लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करून ६० हजार रुपये उकळल्याप्रकरणी संतोष शर्मासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे औद्योगिक परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आशिष सोमनाथ सिनकर यांची सातपूर एम.आय.डी.सी. येथे 'इन्फिनिटी एंटरप्रायजेस' नावाची कंपनी आहे. आरोपी संतोष शर्मा (रा. देवळाली कॅम्प), शशी राजपूत, रोहित म्हस्के, कैलास दवंडे व इतरांनी सिनकर यांच्या कंपनीविरोधात एम.आय.डी.सी. कार्यालयात तक्रार दाखल केली होती. ही तक्रार मागे घेण्यासाठी आरोपींनी दबावाचे तंत्र अवलंबत थेट कंपनीच्या गेटवर अनधिकृत अतिक्रमण केले. आरोपींनी कोणतीही परवानगी न घेता कंपनीच्या प्रवेशद्वारावर "अनधिकृत अतिक्रमण हटवा, एम.आय.डी.सी. बचाव" असा मजकूर असलेले पोस्टर चिकटवून कामगारांमध्ये असंतोष पसरवला. एवढ्यावरच न थांबता, "तुमच्या मालकाने आम्हाला पैसे दिले नाहीत तर आमच्याशी गाठ आहे," अशी धमकी देत कामगारांना अरेरावीची भाषा, शिवीगाळ व धक्काबुक्की केली. त्यामुळे कंपनीतील वातावरण तणावपूर्ण बनले. नोव्हेंबर २०२५ च्या पहिल्या आठवड्यात आरोपींनी थेट कंपनीच्या गेटवर येऊन मालक आशिष सिनकर यांना "तुझा गेम करून टाकीन" अशी जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर तीन लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. जीवितास धोका असल्याची भीती दाखवत आरोपींनी सिनकर यांच्याकडून ६० हजार रुपये खंडणीस्वरूपात उकळल्याचा आरोप आहे. या गंभीर प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात संतोष शर्मासह संबंधित आरोपींविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वीही संतोष शर्मा विविध गुन्ह्यांत संशयित असल्याची चर्चा असून, या नव्या गुन्ह्यामुळे त्याच्या अडचणी वाढल्या आहेत. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बारेला करीत असून, आरोपींच्या इतर कारवायांचाही छडा लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# अखिल भारतीय मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन ९ पासून

## बाळ येशू देवालयाच्या प्रांगणात तीन दिवस रंगणार साहित्य संमेलन

**नाशिक ।** मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळातर्फे ९ ते ११ जानेवारीदरम्यान २७ वे अखिल भारतीय मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन होणार आहे. नाशिकरोड येथील बाळ येशू मंदिराच्या प्रांगणात कविवर्य कुसुमाग्रजनगरीत होणाऱ्या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी सायमन मार्टिन राहणार आहेत.

कविवर्य कुसुमाग्रजनगरीत होणाऱ्या या साहित्य संमेलनाचे उद्घाटन विचारवंत रावसाहेब कसबे यांच्या हस्ते होणार आहे. स्वागताध्यक्ष म्हणून फादर एरॉल फर्नांडिस आहेत. या साहित्य संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे, मिलिंद जोशी, लोकेश शेवडे, प्राचार्य डॉ. वेदश्री थिगळे, फादर आयवो कोयलो, बेनॉल्ड डायस, फिलीप वरा उपस्थित राहणार आहेत. साहित्य संमेलनाचा शुभारंभ ९ जानेवारीस सकाळी १० वाजता ग्रंथदिंडीने होणार आहे. सायंकाळी ७ वाजता निमंत्रितांचे कविसंमेलन होणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी रमण रणदिवे राहणार आहेत.

**विविध पुरस्कारांचे होणार वितरण**

या संमेलनात फादर फ्रान्सिस कोरिया व सुनील आढाव यांना जीवनगौरव पुरस्कार, सनी पाटोळे यांना साहित्य भूषण पुरस्कार, रमण रणदिवे यांना यांना साहित्य व्रती पुरस्कार, मुक्ता टिळक यांना साहित्य गौरव पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते होईल. यावेळी सायमन मार्टिन लिखीत 'देवाशी संवाद' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

**विविध परिसंवादांचे आयोजन**

शनिवारी विविध परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. यात 'समाज विकासाची ख्रिस्ती संकल्पना' या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुरेश पठारे राहतील. यासह 'ख्रिस्ती लेखकांच्या लेखनाच्या प्रेरणा' या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सिसिलिया कर्व्हालो राहतील. 'संविधानिक मूल्यांचे ख्रिस्ती साहित्यात दर्शन' या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी फादर आयवो कोयलो राहतील. सायंकाळी ४ वाजता निमंत्रितांशी ऐसपैस गप्पा रंगणार आहेत. यात अध्यक्षस्थानी फादर ज्यो गायकवाड राहणार आहेत. सायंकाळी ७ वाजता कविसंमेलन होणार असून, अध्यक्षस्थानी पौलस वाघमारे राहतील. रविवारच्या सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी फादर जोएल डिकुन्हा राहतील. साडेअकराला गॉस्पल सिंगिंगने संमेलनाचा समारोप होणार आहे.

# एक्सलो चौक ते गरवारे चौक रस्ता विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी

## वाहतूक नियोजन, औद्योगिक दळणवळण, सिंहस्थ कुंभमेळा नियोजनासाठी महत्त्वाचा प्रकल्प





**नाशिक ।** शहरातील औद्योगिक, दळणवळण तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या एक्सलो चौक ते गरवारे चौक (आऊटर पार्किंग/रेल्वे स्टेशन – त्र्यंबक रोड – मुंबई महामार्ग लिंक रोड) या रस्त्याच्या सुरू असलेल्या विकासकामांची मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

अभ्यासानुसार, नाशिक शहरातील एकूण मालवाहतूकीपैकी सुमारे ६४.५ टक्के वाहतूक रस्ते मार्गे होते. या पार्श्वभूमीवर एक्सलो चौक ते गरवारे चौक हा दुवा अधिक सक्षम केल्यास अंबड व सातपूर एमआयडीसी परिसरात कार्यरत सुमारे ३,५०० उद्योगांतील, विशेषतः ऑटोमोबाईल उत्पादन व अभियांत्रिकी क्षेत्रातील उद्योगांसाठी पुरवठा साखळी अधिक प्रभावी होणार असून, जड मालवाहतुकीसाठी उच्च क्षमतेचा व सुरक्षित मार्ग उपलब्ध होणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात बाह्य वाहनतळ, रेल्वे स्टेशन, त्र्यंबक रोड तसेच मुंबई महामार्गाकडून येणाऱ्या भाविकांची वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी हा रस्ता अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्याचबरोबर हा मार्ग अंबड औद्योगिक परिसरासारख्या नाशिकमधील प्रमुख औद्योगिक क्षेत्रांना थेट रेल्वे मार्ग व मुंबई महामार्गाशी जोडणारा महत्त्वाचा दुवा असून, त्यामुळे मालवाहतूक, लॉजिस्टिक्स व पुरवठा साखळी अधिक सक्षम होऊन नाशिकच्या आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे.

**प्रकल्पाचे महत्त्व व तांत्रिक तपशील**– कॉंक्रिट रस्ता बांधकाम : या रस्त्याचे काम कॉंक्रिट पद्धतीने करण्यात येत असून, सिंहस्थ कुंभमेळ्यासारख्या मोठ्या प्रमाणावरील वाहन व भाविकांच्या वाहतुकीचा ताण लक्षात घेता, दीर्घकाळ टिकणारा व मजबूत रस्ता निर्माण केला जात आहे. पावसाळी पाण्याच्या निचऱ्याची सुविधा : Stormwater Drainage प्रणाली या विकासकामात समाविष्ट करण्यात आली असून, कुंभमेळ्याच्या कालावधीत तसेच पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या टाळण्यासाठी ही व्यवस्था उपयुक्त ठरणार आहे.

**पादचाऱ्यांसाठी सुरक्षित फूटपाथ**– रस्त्यालगत फूटपाथची तरतूद करण्यात येत असून, कुंभमेळ्यादरम्यान मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या भाविकांसह पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ही सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. कामाची व्याप्ती : रस्ता विकासासोबत वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक त्या सुधारणा, समतोल रचना व कुंभमेळ्याच्या कालावधीत वाहतुकीचा प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी तसेच भविष्यात रस्ता वारंवार खोदावा लागू नये यासाठी सर्व युटिलिटी लाईन्सचे अचूक मॅपिंग करूनच कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. कुंभमेळ्याच्या कालावधीत अपघात टाळण्यासाठी व वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने रस्त्यावरील डाव्या वळणांवरील अडथळे हटवून दृश्यता वाढवावी, असे निर्देश देण्यात आले. हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ दरम्यान भाविकांची वाहतूक, औद्योगिक वाहतूक तसेच रेल्वे स्टेशन व मुंबई महामार्गाकडे जाणारा प्रवास अधिक सुलभ करणे, शहरातील दैनंदिन वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणे तसेच नाशिकच्या आर्थिक व पायाभूत विकासाला दीर्घकालीन चालना देणे, हे नाशिक महापालिकेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# नाशिक महानगरपालिका निवडणूक २०२६ मधून नाशिक शहर कॉंग्रेस सेवादल तटस्थ



**नाशिक ।** महानगरपालिका निवडणूक २०२६ करीता भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने नाशिक शहर कॉंग्रेस सेवादलाने पक्षाकडे एकूण २० जागांची मागणी केली होती. मात्र, पक्षातील काही स्वार्थी नेते व पदाधिकाऱ्यांनी कॉंग्रेस सेवादलाला एकाही जागेवर उमेदवारी न देता कार्यकर्त्यांवर अन्याय केला आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक शहर कॉंग्रेस सेवादलाने नाशिक महानगरपालिका निवडणूक २०२६ मध्ये कॉंग्रेस पक्षाच्या कोणत्याही उमेदवाराचा प्रचार न करता तटस्थ भूमिका घेण्याचा निर्णय घेतला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून नाशिक महानगरपालिका तसेच नाशिक स्मार्ट सिटीमधील भ्रष्टाचार जनतेसमोर मांडण्याचे काम कॉंग्रेस सेवादलाच्या कार्यकर्त्यांनी सातत्याने केले आहे. मात्र, या संघर्षशील कार्यकर्त्यांच्या कामाची पक्षाकडून कोणतीही दखल घेतली गेली नाही. उलट, काही विशिष्ट नेते व पदाधिकारी आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी व आर्थिक हितसंबंधांसाठी पक्षाला आपल्या दावणीला बांधून, प्रामाणिक कार्यकर्त्यांवर अन्याय करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रदेश व राष्ट्रीय पातळीवर कार्यकर्त्यांची योग्य दखल घेतली जात नसल्याचे दुर्दैवी वास्तव असून, त्याचाच परिणाम म्हणून आज निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अशी वेळ आली आहे. कॉंग्रेस पक्षाचे विचार, धोरणे व भूमिका जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी नाशिक शहर कॉंग्रेस सेवादलाच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेऊन शहरात पक्ष टिकवण्याचे काम केले आहे. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कॉंग्रेस सेवादलाला एकही उमेदवारी न देणे ही गंभीर बाब आहे. अशा परिस्थितीत, स्वतःला नेते म्हणवून घेणाऱ्या स्वार्थी व स्वयंघोषित पदाधिकाऱ्यांना त्यांची योग्य जागा दाखविल्याशिवाय खरा, निष्ठावंत कॉंग्रेस सेवादलाचा कार्यकर्ता गप्प बसणार नाही, हे स्पष्ट करण्यात येत आहे. नाशिक महानगरपालिका निवडणूक २०२६ मध्ये नाशिक शहर कॉंग्रेस सेवादलाचे सर्व पदाधिकारी तटस्थ भूमिकेत राहणार असून, या संदर्भात महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी सपकाळ साहेब यांना सर्व पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. स्वार्थी व स्वयंघोषित नेत्यांनी आता खऱ्या अर्थाने कॉंग्रेस पक्षाचे काम करावे, अशा शुभेच्छा नाशिक शहर कॉंग्रेस सेवादलाच्या वतीने देण्यात येत आहेत. स्वाक्षरीकर्ते- डॉ. वसंत ठाकूर–शहराध्यक्ष, नाशिक शहर कॉंग्रेस सेवादल, सिद्धार्थ गांगुर्डे–ब्लॉक अध्यक्ष, नाशिक रोड कॉंग्रेस सेवादल, संतोष हिवाळे–ब्लॉक अध्यक्ष, मध्य नाशिक कॉंग्रेस सेवादल, संदीप वाघ–ब्लॉक अध्यक्ष, पंचवटी कॉंग्रेस सेवादल, अशोक लहामगे–ब्लॉक अध्यक्ष, सिडको कॉंग्रेस सेवादल, चंद्रकांत निर्वाण–ब्लॉक अध्यक्ष, सातपूर कॉंग्रेस सेवादल.

# महापालिकेतर्फे फुटपाथवरील अतिक्रमणे हटवली















**नाशिक ।** सिंहस्थ कुंभमेळा व मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी मोहीम राबविण्यात येत असून या मोहिमेअंतर्गत ठक्कर बाजार ते जिल्हा रुग्णालय या रस्त्यावरील फुटपाथावरील अतिक्रमण काढण्यात आले आहे.


आयुक्त मनीषा खत्री, उपायुक्त डॉ संगीता नांदुरकर, उप अभियंता बोरसे, नगररचना विभागाचे खोजे, आरोग्य विभागाचे निरीक्षक गायकवाड, विद्यान विभागाचे निरीक्षक बोडके यांचा सिव्हिल हॉस्पिटल ते ठक्कर बाजार ते सीबीएस पर्यंत सिंहस्थ कुंभमेळ्याचे त्र्यंबक रोड रस्ता रुंदीकरण करणे व फुटपाट वरील अतिक्रमण काढणे व पाहणी दौरा केला.

यावेळी त्यांनी निर्देशित केल्याप्रमाणे या रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात आली. पश्चिम विभाग पश्चिम विभागाचे विनायक जाधव व पश्चिम विभाग प्रमुख पी. एस. बागुल, सुनील कदम, मोहन भांगरे, बापू लांडगे, जावेद शेख, संजय सूर्यवंशी, संतोष पवार, जगन्नाथ हमारे, सचिन जाधव व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी ही कारवाई केली.

# नाशिक भाजपमध्ये 'आयरामां'ची कमाल!

भारतीय जनता पक्षाने नाशिकच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना असा काही धडा शिकविला की, येथून पुढे निष्ठावंत कार्यकर्ता भारतीय जनता पक्षामध्ये शोधूनही सापडणार नाही. अनेकांनी संताप व्यक्त केला, अनेकांनी आपल्या अश्रूंना मोकळी वाट करून दिली, तर कष्ट वाया जाऊ नये म्हणून अनेकांनी अन्य पक्षांचा आधार घेतला. काहीजणांनी राजकारण सोडून दिले. तर अनेकांनी येथून पुढे 'भाई' लोकांना समर्थन दिलेलेच बरे असे मतही व्यक्त केले. तथापि, ज्या नाशिक जिल्ह्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दत्तक घेतले होते, त्याच नाशिक जिल्ह्यातील भारतीय जनता पक्ष निष्ठावंत कार्यकर्त्यांपासून दूर गेल्यासारखे जाणवते. आता या पक्षात राहिले ते सर्व धनिक, भाई व मुख्यमंत्र्यांचे लाडके व नाशिक जिल्ह्याचे अघोषित पालकमंत्री गिरीश महाजन यांना मारणारे व्यावसायिक कार्यकर्ते. शहरातील राजकीय वातावरण कमालीचे तापले. पण पक्षश्रेष्ठींना त्याचे काय पडले? कोणत्याही परिस्थितीत हंड्रेड प्लस हा त्यांचा नारा त्यांना खरा करून दाखवायचा आहे. त्यामुळेच अगदी काल-परवा पक्षात आलेल्यांच्या घरात दोन ते तीन उमेदवाऱ्या देऊन पक्षाच्या नगरसेवकांची संख्या वाढविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. राजकीयदृष्ट्या ते खरेही ठरेल. पण पक्ष संपलेला राहील हे मात्र नक्की. नाशिक जिल्ह्यातील निष्ठावंत व भक्कम असलेला भारतीय जनता पक्ष एका संकटमोचकाने पूर्णपणे संकटात आणून सोडला आहे. तिकीट वाटपाच्या मुद्द्यावरून सर्वच प्रमुख पक्षामध्ये तणाव जरूर आहे. पण शहरातील राजकारणात बलाढ्य शक्ती म्हणून वाचणाऱ्या भारतीय जनता पक्षात हा तणाव जास्तच दिसतो. निष्ठावंत कार्यकर्ते आणि अलीकडेच पक्षात प्रवेश केलेले उमेदवार यांच्यातील संघर्ष निवडणूक कार्यालयाबाहेर सामान्य कार्यकर्ते पाहत होते. परंतु त्यांच्यातील संघर्षात काल-परवा पक्षात आलेले बलाढ्य वाटत होते. येथून पुढे अंतर्गत संघर्ष, शक्तिप्रदर्शन आणि राजकीय गणित सोडविण्याचा प्रयत्न शक्यतो कुणीही करणार नाही. उमेदवारीसाठी भारतीय जनता पक्षाकडे सर्वाधिक गर्दी होती. नाशिक महापालिकेत १२२ जागा आहेत. पण जवळपास साडेबाराशे पेक्षा जास्त अर्ज भाजपकडे आल्यामुळे संघर्ष होणे साहजिक आहे. परंतु न्याय देण्याची भूमिका पक्षाच्या श्रेष्ठींमध्येच होती. तेच पक्षपाती वागल्यामुळे कार्यकर्ते सैरभैर झाले. उमेदवारी अर्ज भरण्याच्या अवघ्या काही तास आधी काही दिग्गज नेत्यांचा पक्षप्रवेश झाला. त्याच दरम्यान तिकीट वाटपात चार ते पाच विद्यमान नगरसेवकांसह अनेक जुने निष्ठावंत कार्यकर्ते डावलले गेल्याने नाराजीचा उद्रेक झाला. अशावेळी स्थानिक आमदार हतबल झाल्यासारखे दिसत होते. थोड्याफार समर्थकांना का होईना उमेदवारी मिळाली तर बरे होईल अशी भूमिका चक्क स्थानिक आमदारांनी घेतली. त्यामुळे त्यातल्या त्यात त्यांच्या काही कट्टर समर्थकांना उमेदवारी मिळाली. तथापि, राजकीय दृष्ट्या भविष्यात आपल्याला पर्याय निर्माण होऊ शकतो, अशांच्या उमेदवाऱ्या परस्पर कटल्या गेल्याने आमदारांनाही त्याचे काहीच वाटले नाही. मंत्री गिरीश महाजन यांनी कार्यकर्त्यांची समजूत काढणे हा पोकळपणा व ढोंग होते हे कार्यकर्त्यांना लक्षात येत होते. कार्यकर्ते कमालीचे नाराज होत होते. या नाराजीचे पडसाद शहरातील विविध भागात उमटले. पण नाराज झालेल्यांपेक्षा अधिक शक्तिशाली कार्यकर्ते पक्षात आल्यामुळे निष्ठावंतांची कुणी दखलही घेतली नाही!





### सत्तेसाठी वाट्टेल ते...!

कपडे बदलतात
तसे नेते चेहरे आणि
पक्ष अगदी सहज बदलतात

विकासाच्या मुलामा
दिलेल्या गोंडस नावाखाली
गोड बोलुन जनतेला
दिवसाढवळ्या रोजच फसवतात

काल पक्षात आलेल्या
आगंतुकांचे सर्वत्र ढोल
बडवले जातात

पक्षाच्या इमारतीच्या पायात
गाडुन घेतलेले निष्ठावंत
कार्यकर्ते मात्र
कायम.. कायम
सडवले जातात

एकेकाळी बुध्दीवंतांचा
गुणवंतांचा महाराष्ट्र
आता मात्र राजकारणात
धनवंतांचा महाराष्ट्र
बनला आहे

हे सर्व घाऊक पक्षांतरं
मला कापड दुकानाबाहेर
नवीन ड्रेस घालुन सजवुन
ठेवलेल्या नकली
पुतळ्यासारखे वाटतात

सत्तेसाठी वाट्टेल ते
हा इथला नवीन फंडा आहे
पैसा आणि दलालांच्या
जोरावर हातात पक्षांतराचा
गंडा दोरा आहे

म्हणून तर
प्रत्येक निवडणुकीत
वेगवेगळ्या पक्षांचा
दलबदलुंचा खांद्यावर
झेंडा आहे.

**- नामदेवराव कोतवाल, सिन्नर**

भारतीय जनता पक्षाचे लोकप्रिय माजी नगरसेवक सतीश सोनवणे यांची उमेदवारी तर फक्त पक्षातील एका नेत्याच्या मुलाच्या सोयीसाठी रद्द करण्यात आली. दुसरे माजी नगरसेवक शशिकांत जाधव हे फक्त राजकारणी नसून एक प्रथितयश उद्योजक आहे. त्यांनाही कारण नसताना भविष्यातील स्पर्धक नको म्हणून घरी बसविण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे अत्यंत अभ्यासू असलेल्या शशिकांत जाधव यांची उमेदवारी काटने हा त्यांनाच नव्हे तर मतदार संघातील जनतेला देखील धक्का होता. सतीश बापू सोनवणे यांना तर भाजपमधीलच एका नेत्याने यापूर्वीच सावधानतेचा इशारा दिला होता. तथापि, आपल्या कर्तबगारीच्या आलेखावर कुणी धोका देणार नाही असे त्यांना वाटत होते. परंतु त्यांच्या कार्यकर्त्यांनी थेट अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून उमेदवारीही मिळविली. परंतु ज्या पक्षासाठी प्रचंड यातना सहन केल्या, त्या पक्षाने त्यांच्यासारख्यांना घरी बसविणे लोकांना आवडलेले दिसले नाही. माजी महापौर अशोक मुर्तडक यांना तर कारण नसताना घरी बसविले. प्राध्यापक वर्षा भालेराव या तर त्यांच्या मतदार संघातील अत्यंत लोकप्रिय महिला नगरसेविका. अतिशय उच्चशिक्षित व शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे लोकप्रियता मिळविलेल्या भालेराव यांच्यावर झालेला अन्याय करून निघणार नाही. त्यांचे पती अनिल भालेराव पक्षाच्या कोणत्याही कामासाठी घरातील कामासारखे धावून जात होते. पण आयारामांसाठी त्यांनाही घरी बसविण्यात आले. भारतीय जनता पक्षाचे गणेश कांबळे, प्रशांत कोटकर यांनी तर आपली उमेदवारी कोणीही रद्द करू शकत नाही, इतका आत्मविश्वास वेळोवेळी व्यक्त केला होता. पण त्यांनाही नेहमीप्रमाणे घरीच बसविले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने तर मेघा साळवे यांची तर चक्क फसवणूक केली. पक्षप्रवेश केल्यानंतर उमेदवारी त्यांची





जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०



निश्चित केली होती. पण ऐनवेळी या पक्षाने देखील वेळेवर पक्षात आलेल्यांना उमेदवारी देऊन त्यांचा पत्ता कट केला. या सर्वांवर नक्कीच अन्याय झाला आहे. नाशिक पूर्वचे आमदार राहुल ढिकले यांना निवडणुकीच्या काळात गणेश गीते व कमलेश बोडके या माजी नगरसेवकांनी कमालीचा त्रास दिला होता. त्यांच्या उमेदवारी रद्द झाल्या असत्या तर एक वेळ समजता आले असते. परंतु गीते यांच्या पत्नीला उमेदवारी दिली, तर बोडके यांना घरी बसविले. अनेक माजी मंडलाध्यक्ष व ज्येष्ठ सदस्यांना तिकीट नाकारल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. या अंतर्गत नाराजीचा थेट परिणाम निवडणूक निकालावर होवू शकतो. शिवसेना उद्धव ठाकरे यांची शिवसेना प्रतिकूल परिस्थितीतही शक्तीप्रदर्शन करत होती. निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या बाहेर आ. सीमा हिरे आणि इच्छुक उमेदवार कैलास आहिरे यांच्यात झालेली बाचाबाची नाशिककरांनी समाज माध्यमांमध्ये पाहिली. अनेक दिग्गजांच्या वाट्याला वाटाण्याच्या अक्षदा येत असताना आपली डाळ तिथे शिजणार नाही याचा अंदाज अनेकांना आला. तरी देखील माजी महापौर अशोक मुर्तडक, शीतल माळोदे, पूनम सोनवणे, कमलेश बोडके, सतीश सोनवणे, शाहीन मिर्झा, रूची कुंभारकर, शशी जाधव, वर्षा भालेराव, प्रियांका घाटे, अंबादास पगारे, दिलीप दातीर, पंडित आवारे, मीरा हांडगे, श्यामला दीक्षित, प्रशांत जाधव यांना पक्षाने आराम करायला सांगितलं. विशेष म्हणजे यातील अनेक जण पक्षासाठी इतके सक्रिय होते की, त्यांच्या जीवावरच आजचा भारतीय जनता पक्ष थाटात उभा राहिला आहे. मुख्यमंत्र्यांनी दत्तक घेतलेल्या नाशिक महापालिकेत एकहाती यश मिळूनही सत्ता राबविताना अंतर्गत सुंदोपसुंदीमुळे भाजपसमोर आता वेगवेगळी आव्हाने उभी ठाकली आहे. १२२ सदस्यांच्या महापालिकेत ६६ जागांवर विजय मिळवत भाजपने प्रथमच एकहाती सत्ता हस्तगत केली होती. केंद्र, राज्य व महापालिकेत एकाच पक्षाचे सरकार असल्याने त्याचा नाशिकला लाभ होईल, असा प्रचार त्यावेळी झाला होता. स्थानिक पातळीवर भाजपमध्ये नवे-जुने हा वाद आहे. शहरातील तीन आमदारांमध्ये तसे फारसे सख्य नाही. शहराध्यक्षपदाची धुरा सांभाळणारे सुनिल केदार यांनाही कार्यकर्त्यांनी आता लक्ष्य केले आहे. पैसे घेऊन उमेदवारीचे वाटप झाले हा आरोपही तसा मोठा आहे. परंतु घटना इतक्या मोठ्या घडल्या की, त्या आरोपाकडे कोणी गांभीर्याने देखील पाहिले नाही. भाजपकडे आता नवखे चेहरे अधिक असून अनुभवी नगरसेवकांची कमतरता तयार झाली आहे. नव्या-जुन्यांचा ताळमेळ बसविण्याचे आव्हान पेलने आता शक्य नाही. जुन्या प्रामाणिक पदाधिकाऱ्यांना कमी महत्वाची तर नव्याने आलेल्यांना महत्वाची पदे दिली जाणारच असल्याची खात्री पक्षातील निष्ठावंतांना आजच होत आहे. सुधाकर बडगुजर, दिनकर पाटील यांनी तर भारतीय जनता पक्षात प्रवेश करून इतिहासच घडविला. त्यांनी फक्त पक्षप्रवेश नव्हेच तर कुटुंबाची देखील सोय करून टाकली. असे भाग्य फार कमी नगरसेवकांच्या वाट्याला आले ही वस्तुस्थिती आहे!

### नाशिकमध्ये राजकीय विनोदाला आले थैमान

कोणी एबी फॉर्म साठी फार्म हाऊसचे दरवाजे तोडतो आहे, कोणाला उमेदवारी नाकारल्याने अश्रू अनावर झालेत, तर कोणी दुःखात घेरी येऊन पडलंय, कोणी रॉकेल ओतून घेतंय....जनतेच्या सेवेसाठीची ही तळमळ पाहिली की, लोकशाहीवरचा विश्वास अजून दृढ होतो, हा संदेश समाज माध्यमाच्या माध्यमातून घराघरात पोहोचल्यावर अनेकांना हसू फुटत होते. भारतीय जनता पक्षात आयुष्य काढलेला एक उमेदवार अन्य पक्षात प्रवेश करून उमेदवारी मिळाल्यानंतर त्याचे कार्यकर्ते जोर जोराने 'जय श्रीराम'च्या घोषणा देत होते. त्याचवेळी एका कार्यकर्त्याने या पक्षात जय श्रीरामच्या घोषणा देऊ नका असे सांगताच घोषणा बंद झाल्या. तर दुसऱ्या बाजूला ठाकरेंच्या शिवसेनेतून व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून बाहेर पडून भाजपमध्ये गेलेल्या एकाने टीका करताना राज साहेब, उद्धव साहेब, आदित्य साहेब, मातोश्री असे आदरार्थी उल्लेख केल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर हसू उमटत होते. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील एका कार्यकर्त्यांनी तर आपल्याला उमेदवारी मिळणार नाही असे कळताच भाजप, शरद पवार यांची राष्ट्रवादी, मनसे, ठाकरेंची शिवसेना, काँग्रेस, एवढेच नव्हे तर वंचित बहुजन आघाडीकडे देखील प्रस्ताव दिला होता. तथापि, सर्व बाजूने नकारघंटा ऐकल्यावर राजकारण किती घाणेरडे झाले आहे, यावर त्यांनी भर गर्दीत 'व्याख्यान' द्यायला सुरुवात केली. आजकाल निष्ठावान कार्यकर्ता शोधूनही सापडणार नाही. आपण निष्ठावान कार्यकर्ते होतो असे त्यांनी जोरजोरात सांगायला सुरुवात करताच कार्यकर्ते दूर जाऊन पोट धरून हसत होते.

### पक्षश्रेष्ठींच्या सज्जड दमबाजीमुळे माघार

भाजपाच्या प्रदेश नेत्यांनी कोणत्याही आमदारांच्या मुला मुलींना उमेदवारी दिली जाणार नाही असे जाहिर केल्यावर मुंबईत सर्वप्रथम विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याच घरात तीन उमेदवारी दिल्या त्यामुळे या घोषणाकडे अनेकांनी दुर्लक्ष केले. आमदार देवयानी फरांदे यांचे पूत्र अंजिक्य आणि आमदार सीमा हिरे यांची कन्या रश्मी हिरे यांची उमेदवारी निश्चित समजण्यात येत होती. त्यामुळे थाटामाटात उमेदवारी अर्ज देखील दाखल केले. आमदार फरांदे यांचे पुत्र अजिंक्य यांनी प्रभाग क्रमांक ७ मधून ओबीसी गटातून अर्ज दाखल केला होता. तर आमदार हिरे यांच्या कन्या रश्मी यांनी सातपूर विभागातील प्रभाग क्रमांक ८ मधून ओबीसी महिला याच प्रवर्गातून अर्ज दाखल केला होता. परंतु अर्ज दाखल केल्यानंतर ऐनवेळी पक्ष कार्यालयाकडन निरोप देण्यात आल्याने या दोघांची उमेदवारी अडचणीत सापडली. पक्षाकडून आमदारांनाच सज्जड दम दिल्याने त्यांनी आपापल्या मुलांना उमेदवारी अर्ज माघार घ्यायला लावली. त्यानंतर नाटकी पद्धतीने पक्षाचा आदेश किती महान असतो, याचा पाढा त्यांना वाचावा लागला. अर्थात त्यामागे कोण नेता आहे हे नाशिक मध्ये काही लपून राहिले नाही. नाशिकच्या राजकीय पटलावर मात्र आमदारांवर टीका होऊ लागली आहे. जे लोकप्रतिनिधी स्वतःच्या मुलांनाही उमेदवारी आणू शकत नाही ते इतरांना काय उमेदवारी आणून देणार? मात्र उमेदवारी मिळविताना सर्व प्रकारचा जोर लावूनही उमेदवारी न मिळाल्याने अनेक कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला, तर काहींनी इथून पुढे आपल्या व्यवसायातच लक्ष घालण्याचा मानस व्यक्त केला.

## ➤ महत्त्वाचे

### मविप्र युवा स्पंदन कार्यशाळा संपन्न

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या वतीने एक दिवसीय मविप्र युवा स्पंदन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे सरचिटणीस एडवोकेट नितीन ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थित सांस्कृतिक समन्वयकांना कलागुणांना विकसित करण्याचे आवाहन केले त्याचप्रमाणे कलागुण केवळ आवड म्हणून नाही तर अर्थाजनाचे साधन म्हणून देखील आज उदयास येत आहे असे प्रतिपादन केले तसेच त्यांनी आगामी मविप्र युवास्पंदन स्पर्धेसाठी सर्वांना शुभेच्छा देखील दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केटीएचएम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ कल्पना आहिरे यांनी केले त्यांनी उपस्थितांना स्पर्धेविषयी माहिती दिली. उद्घाटन समारंभ प्रसंगी संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ नितीन जाधव डॉ भास्कर ढोके डॉ विलास देशमुख स्पर्धेचे समन्वयक डॉ तुषार पाटील आदी उपस्थित होते कार्यशाळेतील पहिल्या मार्गदर्शन सत्रात श्री सदानंद जोशी यांनी नाट्य विभागावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात श्रीमती शुभांगी साळवे यांनी नृत्य तर तिसऱ्या सत्रात श्री आनंद अत्रे यांनी संगीत विभागावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी संस्थेच्या विविध महाविद्यालयांमधून सांस्कृतिक समन्वयक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वीतेसाठी डॉ जयश्री जाधव डॉ मिलिंद थोरात डॉ सुलक्षणा कोळी डॉ कल्पना वाजे प्रा राजेश्वरी जाधव प्रा तेजस बिल्डीकर आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ तुषार पाटील यांनी केले.

## डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात 'म्युझिकल योगा' उपक्रम

**नाशिक ।** अभ्यासाचा वाढता व्याप आणि ताणतणावाच्या पार्श्वभूमीवर शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी मराठा विद्या प्रसारक समाज संचलित डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय व ब्रह्मकुमारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'म्युझिकल योगा व मेडिटेशन' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

प्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ डॉ. उज्वल कापडणीस यांनी डिझाइन केलेल्या या विशेष उपक्रमाचा शुभारंभ २२ डिसेंबर रोजी महाविद्यालय प्रांगणात उत्साहात झाला. मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे व अधि ष्ठाता डॉ. सुधीर भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.





यावेळी प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शिरीष राजे व त्यांच्या सहकाऱ्यांनी म्युझिकल योगाची प्रात्यक्षिके सादर केली.

ब्रह्मकुमारी पूनम दीदी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "शारीरिक आणि मानसिक योग एकत्र केल्यानेच खऱ्या अर्थाने ताणतणावापासून मुक्ती मिळते. अभ्यासाच्या धावपळीत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ काढणे ही काळाची गरज आहे." यावेळी डॉ. उज्ज्वल कापडणीस यांनी सांगितले की, "हा एक हाय इंटेन्सिव्ह इंटरव्हल ट्रेनिंग' प्रोग्राम आहे. यामध्ये संगीताच्या तालावर हृदयाची गती वाढवून ती पुन्हा पूर्ववत केली जाते. मेडिकलच्या विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढवण्यासाठी आणि शारीरिक क्षमतेसाठी हा प्रकार अत्यंत प्रभावी ठरेल." असे सांगितले.

या उपक्रमासाठी डॉ. मनीषा कापडणीस, डॉ. प्रेमा जोशी प्राध्यापक व विभाग प्रमुख,डॉ. सतीश वाघमारे, प्राध्यापक शारीरक्रियाशास्त्र विभाग, यांनी कार्यक्रमाचे उत्तम संयोजन करून मोलाचे सहकार्य केले. यावेळी वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग व फिजिओथेरपी महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्योतिष धर्माचार्य उपाधी डॉ. सचिन पाडेकर शास्त्री यांना प्रदान





**नाशिक ।** संकेश्वर पीठातर्फे डॉ. सचिन पाडेकर यांना ज्योतिष धर्माचार्य ही उपाधीने संकेश्वर पिठाचे मानपत्र प्रदान शंकराचार्य प.पु. सच्चिदानंद अभिनव विद्यानृसिंह भारती महास्वामी यांच्या हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले.

## श्रीकृष्णाने सांगितलेले आजचे वास्तव..

मानव ज्या समाजात राहतो त्या समाजाचा एक घटक बनतो. कुटुंबाकडून नात्यांचे संस्कार समाजाला आकार देतात. कुटुंबात प्रेम, वात्सल्य, आपुलकी जिव्हाळा असेल तर त्या कुटुंबातील व्यक्तींचे संस्कार समाजाला नवी दिशा देतात, समाज सुद्धा संस्कृत बनतो. भारतात अनेक समाजव्यवस्था आदर्शचे मानकरी आहेत. जो समाज विकासासाठी प्रयत्नशील असतो तो समाज विचाराने समृद्ध असतो. श्रीकृष्णाचे बालपण त्याच संस्काराने वाढले ती गोकुळ नगरी आजही आदर्श मानली जाते, पण जिथे कंस आणि कौरव सारखे विचार होते त्यांचे उदाहरण आजही वैरभाव दुश्मनी,कटकारस्थान म्हणूनच घेतले जाते.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात,कलियुगात नात्यांमध्ये प्रेम, आपुलकी ऐवजी स्वार्थीपणा दिसत आहे.नात्यातील ओलावा, भावनिकता बाजूला ठेवून जो तो स्वार्थ साधण्यासाठी नाते टिकवून ठेवत आहे. समाजव्यवस्था स्वार्थाने गुरफटली आहे. माझा स्वार्थ साध्य होईल का?.... कृष्ण म्हणतात, जिथे फायदा तिथेच प्रेम आहे.... नाते-मित्र- सहकारी फक्त दिखावा... दाखवण्यासाठी हा माझा नातेवाईक, हा माझा मित्र,हा माझा सहकारी, हा माझा वरिष्ठ, हा माझा कनिष्ठ.. पण जसा समोरच माणूस आहे तसाच स्वतःही एक माणूसच आहे हाच बदल विचारांचा असतो. ज्या माणसांनी कुटुंब, समाज व्यवस्था उभी आहे तेथील निस्वार्थ भाव आज हरवलेला आहे. लोक आपल्या बरोबर असतात पण निस्वार्थ मनाने नाही तर त्यातही स्वार्थाचा गाभा दडलेला असतो. कोणतेही नाते मनापासून नसून फक्त दाखवण्यापुरतेच मिरवतात. आज अधिकाधिक खोटे बोलतो- वागतो तोच जिंकतो, कारण सत्य नेहमी पटवून द्यावे लागते. सत्य पटवून देण्यासाठी संघर्ष करावा लागतो, सत्याचा संघर्ष जीवनाला अनेकदा हार पत्करण्यास कारणीभूत ठरतो. सत्यासाठी खोट्या बरोबर सतत लढावे लागते खरे वागणाऱ्याला शांत रहावे लागते किबहुना जाणकार म्हणतात, कशाला स्वता:ला त्रास करून घेतात, खोट्याची नितीमत्ता खोट्या जवळ...अन खऱ्याने शांत बसावे ही आजची वस्तुस्थिती आहे. जो जास्तीत जास्त खोटे बोलणार,कट कारस्थान करणार तो अधिक जवळचा वाटणार हे आजचे सत्य आहे. आपल्या बरोबर जी व्यक्ती आहे असे वाटते तोच पाठीत खंजीर खुपसणार असतो, त्यामुळे सामान्य माणसांचे जीवन कवडीमोल झाले आहे.

दुसरी बाजू सत्य म्हणजे व्यक्ती जे जे करतो ते इथेच फेडावे लागते, कोणत्या ना कोणत्या रूपाने न कळत परिस्थितीने माणूस शिकतो पण कुत्र्याची शेपूट कधी सरळ होणार नाही. तोच मानवी स्वभाव आहे. शेवटपर्यंत स्वार्थासाठी सूड भावना ठेवून आपले पण दाखवणारा माणूस रुपी शत्रू आपल्याच आजूबाजूला असतात. जेव्हा कळते तेव्हा आपणच मार्ग बदलून आपले जीवन सुखकारक करावे आणि वास्तव जाणून प्रत्येकाने आपल्या जीवनाचा मार्ग आनंददायी करावा. आपले पौराणिक आणि धार्मिक ग्रंथ आपल्याला जीवन जगणे शिकवते.



भगवान श्रीकृष्ण हे महाभारतातील केवळ नायक नसून आदर्श समाजव्यवस्थेचे प्रतीक आहेत. महाभारत हा केवळ युद्धग्रंथ नसून भारतीय समाजव्यवस्थेचा आरसा आहे. राजधर्माची संकल्पना भीष्मांनी युधिष्ठिराला दिलेले उपदेश राज्यकारभार हा लोककल्याण, न्याय व नैतिकतेवर आधारित असावा. राजा हा प्रजेचा सेवक असून न्याय व लोककल्याण हेच शासनाचे मूळ तत्त्व आज हरवले आहे. पांडवांचे ऐक्य, कौरवांचे विघटन हे सामाजिक स्थैर्याचे धडे यात पांडवांचे ऐक्य समाजाला बळ देते, तर द्वेष विनाशाकडे नेतो. त्याकाळातील राजसभा, मंत्रिसभा आणि सार्वजनिक चर्चा सामूहिक निर्णयांची परंपरा आज जवळपास संपलीच आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तव्यांचे पालन करणे युधिष्ठिर, अर्जुन, कर्ण यांची जीवनधारणा आज हरवलेली दिसते.कर्णाची दानशूरता समाजातील समतोल साधण्याची भावना आजच्या मानवाने त्यागली आहे. युद्धातील नियम, मर्यादा आणि त्यांचे उल्लंघन समाजधर्माचे प्रतिबिंब दिसते तर द्रौपदी वस्त्रहरण प्रसंग समाजातील नैतिक अधःपतनावर कठोर प्रश्न उभा करतो ज्याने आज कळस गाठला आहे. महाभारत आपल्याला शिकवते की, धर्म, न्याय आणि नैतिकता यांवर उभी असलेली समाजव्यवस्था हीच खरी आदर्श समाजव्यवस्था आहे. भगवान श्रीकृष्ण आपल्याला शिकवतात की, धर्माशी बांधील राहून विवेक, करुणा आणि कर्तव्य यांच्या आधारे चालणारी समाजव्यवस्था हीच शाश्वत व आदर्श समाजव्यवस्था आहे ज्याची आज खरी गरज आहे. कुटुंबाचे, समाजाचे, देशाचे नेतृत्व करण्यासाठी आज खऱ्या समाजरक्षकांची गरज आहे की ज्यात बुद्धी असावी दूरदृष्टी आणि नीतीचा वापर होणे अत्यावश्यक आहे. अधिकारात सत्ता, संपत्ती आणि खुर्चीपेक्षा कर्तव्याला प्राधान्य असावे हेच श्रीकृष्णाचे म्हणणे आज समाज व्यवस्थेला क्रमप्राप्त आहे. कुटुंब आणि समाज व्यवस्थेसाठी भारताला सुसंस्कृत विकासात्मक बनवण्यासाठी श्रीकृष्ण विचार आचाराची नितांत गरज आहे. श्रीकृष्ण विचार आचाराचा शोध मानवाने घ्यावा आणि समाजात आदर्श निर्माण करावा.



**- डॉ. जयश्री पंढरीनाथ जाधव – कदम**
**सहाय्यक प्राध्यापक–अर्थशास्त्र**
**के.टी.एच.एम.कॉलेज नाशिक**
**मो.न.९८८१९३८८५८**
**jadhavjp31@gmail.com**



# वर्षाअंती शेअर बाजार वाढीसह बंद
## सेन्सेक्समध्ये ५४६ अंकांची झेप

**सेन्सेक्स 85,220**
**निफ्टी 26,129**

मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी

२०२५ च्या अखेरच्या दिवशी शेअर बाजार वाढीसह बंद झाला. दोन्ही प्रमुख बेंचमार्क निर्देशांक हिरव्या चिन्हात बंद झाले. याशिवाय, बुधवारी मेटल क्षेत्रातही जोरदार तेजी पाहायला मिळाली. सरकारने पुढील तीन वर्षांसाठी काही प्रकारच्या आयातीत स्टीलवर सेफगार्ड ड्युटी लावण्याचा निर्णय घेतल्यामुळे ही वाढ झाली. तसेच तेल आणि वायू (ऑइल अँड गॅस) क्षेत्रातही तेजी दिसून आली.

बुधवारी सेन्सेक्सने ८४,७९३ पातळीवर व्यवहाराची सुरुवात केली आणि दिवसअखेर ०.६४ टक्क्यांच्या वाढीसह ८५,२२० पातळीवर बंद झाला. तर निफ्टी ५० ने २५,९७१ पातळीवर ओपनिंग घेतली आणि दिवसअखेर ०.७४ टक्क्यांच्या वाढीसह २६,१२९ पातळीवर बंद झाला. बेंचमार्क निर्देशांकांच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांची कामगिरी अत्यंत उत्कृष्ट राहिली. बीएसई मिडकॅप निर्देशांकात १ टक्क्यांची वाढ झाली, तर बीएसई स्मॉलकॅप निर्देशांकात १.१८ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक वाढ जेएसडब्ल्यू स्टीलमध्ये दिसून आली, ज्याच्या शेअरमध्ये ४.७९ टक्क्यांची तेजी होती. त्यानंतर टाटा स्टीलमध्ये २.४४ टक्के, ओएनजीसीमध्ये २.४३ टक्के, कोटक बँकेत २.२५ टक्के आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडमध्ये १.९९ टक्क्यांची वाढ झाली.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक नुकसान टीसीएसला झाले असून त्याच्या शेअरमध्ये १.२६ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर टेक महिंद्रामध्ये ०.८६ टक्के, ग्रासिम इंडस्ट्रीजमध्ये ०.४५ टक्के, इन्फोसिसमध्ये ०.३९ टक्के आणि बजाज फायनान्समध्ये ०.२६ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली.

# नागपूरच्या वैद्यकीय क्षेत्रावर जणू वीज कोसळली
## प्रभावशाली न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे अकस्मात निधन

नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी

राजकारणात जशी एखादी अनपेक्षित घटना संपूर्ण समीकरणे बदलते, तसाच जबरदस्त धक्का नागपूरच्या वैद्यकीय विश्वाला आज बसला आहे. बुधवारी, ३१ डिसेंबरच्या पहाटे, शहरातील नामवंत न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मात निधन झाले आणि नागपूरच्या आरोग्य व्यवस्थेतच नव्हे, तर समाजमनातही पोकळी निर्माण झाली.

धंतोली येथील न्यूरॉन हॉस्पिटलशी दीर्घकाळ जोडलेले डॉ. पाखमोडे हे केवळ डॉक्टर नव्हते, तर मध्य भारतातील न्यूरोसर्जरीचे एक 'निर्णायक चेहरा' म्हणून ओळखले जात होते. अवघ्या ५० व्या वर्षी, पहाटे अचानक मायोकार्डियल इन्फार्क्शनचा झटका आला आणि क्षणातच सगळं बदलून गेलं.

पहाटे साडेचारपासून सकाळी सहा वाजेपर्यंत शहरातील वरिष्ठ कार्डिओलॉजिस्ट आणि डॉक्टरांची 'आपत्कालीन फळी' जणू रणांगणात उतरली होती. सलग सीपीआर, तातडीचे सर्व उपचार, प्रत्येक शक्यता आजमावली गेली... पण नियतीसमोर सारे प्रयत्न निष्प्रभ ठरले. अखेर डॉक्टरांनीच डॉक्टर गमावल्याची



वेदनादायक घोषणा झाली.

डॉ. पाखमोडे यांचे जाणे म्हणजे केवळ एक व्यक्ती हरपणे नव्हे, तर नागपूरच्या वैद्यकीय धोरणात्मक ताकदीला बसलेला मोठा धक्का आहे, अशी भावना अनेक सहकाऱ्यांतून व्यक्त होत आहे. ज्या पद्धतीने राजकारणात अनुभवी नेता अचानक निघून गेल्यावर सत्ता-संतुलन ढवळून निघते, तशीच अस्वस्थता आज आरोग्य क्षेत्रात दिसून आली.

कठीण न्यूरोसर्जरी, रुग्णांशी असलेली आपुलकी, आणि उपचारात दाखवलेली ठाम भूमिका—यामुळे ते रुग्णांसाठी 'शेवटचा विश्वास' ठरले होते. त्यांच्या अनेक शस्त्रक्रियांनी असंख्य कुटुंबांना नवी आशा दिली. आज मात्र तेच रुग्ण, डॉक्टर आणि शुभेच्छुक, हळहळ व्यक्त करताना दिसत आहेत.

शहरातील वैद्यकीय वर्तुळात चर्चा आहे की, डॉ. पाखमोडे यांचे अकस्मात जाणे हे नागपूरच्या आरोग्य व्यवस्थेसाठी 'रिक्त पद' नाही, तर 'रिक्त नेतृत्व' आहे. पुढील काळात ही उणीव भरून काढणे किती कठीण असेल, याची जाणीव आता प्रकर्षाने होत आहे.

एक गोष्ट मात्र निश्चितडॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे कौशल्य, त्यांची निर्भीड निर्णयक्षमता आणि रुग्णसेवेतील निष्ठा, ही केवळ वैद्यकीय इतिहासात नाही, तर नागपूरच्या सामूहिक स्मरणात दीर्घकाळ जिवंत राहणार आहे.

# उंदरांनी खाल्ला २०० किलो गांजा; पोलिसांचा दावा

रांची, दि. ३१ वृत्तसंस्था

## आरोपीची निर्दोष मुक्तता

झारखंडमध्ये एक आश्चर्यकारक प्रकार समोर आला आहे. झारखंड पोलिसांनी तीन वर्षांपूर्वी एक मोठी कारवाई केली होती. पोलिसांनी एका वाहनाची तपासणी केली असता त्या वाहनात मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ आढळले होते. त्यामुळे पोलिसांनी आरोपींसह वाहन आणि संबंधित अंमली पदार्थ जप्त करत कारवाई केली होती.

त्यानंतर आता २०२४ मध्ये जेव्हा या प्रकरणी खटल्याच्या सुनावणीवेळी हे पदार्थ (पुरावा) न्यायालयात सादर करण्याची वेळ आली तेव्हा पोलिसांनी केलेला दावा ऐकून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. पोलिसांनी न्यायालयात दावा केला की, कारवाई केल्यानंतर जप्त करण्यात आलेला अंमली पदार्थ (गांजा) गोदामात साठवून ठेवण्यात आला होता. मात्र, तो गांजा आता उंदरांनी खाल्ला आहे.

पोलिसांनी केलेला दावा ऐकल्यानंतर या प्रकरणातील आरोपीला रांची येथील विशेष एनडीपीएस न्यायालयाने निर्दोष मुक्त केलं आहे. कारण या प्रकरणात न्यायालयाने तपासात अनेक त्रुटी अधोरेखित केल्या. तसेच पोलिसांना न्यायालयासमोर पुरावा सादर करता आला नाही. त्यामुळे न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

दरम्यान, फिर्यादी पक्षाच्या म्हणण्यानुसार, रांची जिल्ह्यातील ओरमांझी पोलिसांनी १७ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय महामार्ग-२० वर एका पांढऱ्या रंगाची बोलेरो



गाडीवर कारवाई करण्यात आली असता अंमली पदार्थांची तस्करी करण्यात येत असल्याचं आढळून आले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ती गाडी थांबवल्यानंतर त्या गाडीमधून तिघे जण उडी मारून पळून जाण्याचा प्रयत्न करत होते. त्यातील इंद्रजित याला अटक करण्यात आली होती, तर आणखी दोन जण पळून जाण्यात यशस्वी झाले होते. तेव्हा पोलिसांनी गाडीची झडती घेतली आणि डब्यांमध्ये लपवून ठेवलेला सुमारे १७० पॅकेटमध्ये पॅक केलेला २०० किलो गांजा सापडल्याचा दावा पोलिसांनी केला होता.

# सौदी अरेबियाचा हवाई हल्ला
## यूएईची सैन्य माघारीची घोषणा

रियाद, दि. ३१ वृत्तसंस्था

सौदी अरेबिया व संयुक्त अरब अमिराती (यूएई) या तेल पुरवठा करणाऱ्या महत्वाच्या दोन अरब राष्ट्रांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. सौदी अरेबियाने येमेनमधील मुकल्ला बंदरावर हवाई हल्ला केला आहे. येमेनमध्ये सध्या यूएईच्या सैन्याची मोठ्या प्रमाणात उपस्थिती आहे. येमेनमधील बंडखोरांना शस्त्र व दारूगोळा पुरवण्यासाठी यूएईने एक जहाज मुकल्ला बंदरावर पाठवले, असा संशय सौदी अरेबियाला होता. त्यामुळे सौदी अरेबियाने यूएईने पाठवलेल्या जहाजाला लक्ष्य करण्यासाठी मुकल्ला बंदरावर 'एअरस्ट्राईक' केले आहे. त्यानंतर यूएईने आपले सैन्य येमेनमधून माघारी बोलावणार असल्याचे घोषित केले आहे. तेल पुरवठा करणाऱ्या दोन मुस्लिम राष्ट्रांमध्ये यामुळे तणावाची स्थिती निर्माण झाली आहे.

सौदी अरेबियाने मंगळवारी यूएईला येमेनमधील सैन्य मागे घेण्यास चोवीस तासांची मुदत दिली होती. त्यानंतर काही तासांतच सौदी अरेबियाकडून मुकल्ला बंदरावर हवाई हल्ला करण्यात आला आहे. सौदी अरेबियाच्या हल्ल्यानंतर येमेनमधून सैन्य माघारी घेणार असल्याची घोषणा यूएईने केली आहे. यूएईने शस्त्र व दारूगोळा येमेनमधील फुटीरतावादी संघटनांच्या मदतीसाठी पाठवल्याने सौदी अरेबियाची सुरक्षितता धोक्यात आली होती, सौदीच्या अरेबियाच्या संरक्षणासाठी 'एअरस्ट्राइक' केल्याचे सौदी अरेबियाने म्हटले आहे. दरम्यान, यूएईने सौदी



अरेबियाने केलेला दावा फेटाळला आहे. जहाजातील शस्त्रे ही यूएईच्या सैनिकांसाठी पाठवली होती, असे यूएईने म्हटले आहे.

सौदी अरेबियाने केलेल्या हवाई हल्ल्याचे आश्चर्य वाटते, असे यूएईच्या परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. दोन्ही देशांमध्ये तणाव वाढल्यानंतर अमेरिकेचे स्टेट सेक्रेटरी मार्को रुबियो यांनी सौदी अरेबिया व यूएईच्या परराष्ट्र मंत्र्यांशी फोनवर चर्चा केली. कुवेत, बहरीन, कतार या देशांनी सौदी अरेबिया व यूएईमधील तणावावर चिंता व्यक्त केली आहे. दरम्यान, हवाई हल्ल्यानंतर येमेनमध्ये दहशतवाद्यांच्या विरोधात सुरू असलेली मोहीम संपवत असल्याचे यूएईने घोषित केले आहे. "आमची दहशतवाद्यांविरोधात सुरू असलेली मोहीम आता शेवटच्या टप्प्यात आहे", असे यूएईने म्हटले आहे.

येमेनमधील फुटीरतावादी संघटना साऊदर्न ट्रान्सिशनल कौन्सिलला (STC) यूएई मदत करत आहे, तसेच STC च्या बंडखोरांना सौदी अरेबियाच्या सीमांवर पाठवत आहे. यामुळे सौदी अरेबियाच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झाल्याचे सौदी अरेबियाकडून सांगण्यात आले होते. सौदी अरेबिया व यूएई या दोन देशांनी मिळून येमेनमधील हुतींच्या विरोधात लढा दिला होता. त्यानंतर सौदी अरेबियाने येमेनमधील सरकारला पाठिंबा दिला, तर यूएईने येमेनच्या दक्षिण भागात असलेल्या फुटीरतावादी संघटना STC ला पाठिंबा दिला. सौदी अरेबियाचा पाठिंबा असलेल्या येमेन सरकारमधील रशद-अल-अलिमी म्हणाले, "यूएई येमेनमधील बंडखोरांना पाठिंबा देत असून त्यांना येमेनमध्ये बंड करण्यासाठी उत्तेजित करत आहे, हे स्पष्ट होते."

# रशिया भारताला देणार घातक एअर डिफेन्स सिस्टम

नवी दिल्ली, दि. ३१ वृत्तसंस्था

रशियाने भारताला त्यांची मध्यम पल्ल्याची एअर डिफेन्स सिस्टम एस-३५० ऑफर केली आहे. विशेष म्हणजे रशियाने ही ऑफर टेक्नॉलॉजी ट्रान्सफरसह दिली आहे. म्हणजे भारत या एअर डिफेन्स सिस्टमचे काही भाग हे स्वतः बनवू शकतो. मिळालेल्या माहितीनुसार ही सिस्टम



भारताच्या सध्याच्या एस ४०० ट्रायम्फ बॅटऱ्यांना देखील सपोर्ट करू शकणार आहे. यामुळे भारताची एकात्मिक एअर डिफेन्स सिस्टम नेटवर्क अजून स्ट्राँग होणार आहे.

नुकत्याच झालेल्या उच्च स्तरावरील चर्चेत एस-३५० व्यतिरिक्त एस-४०० रेजिमेंट्स आणि एस-५०० सिस्टमवर देखील चर्चा झाली आहे. मात्र रशिया सध्या एस-३५० सिस्टम त्वरित उपलब्ध आणि व्यवहारिक पर्यायाच्या स्वरूपात पुढं केलं आहे. भारतात आधीपासूनच एस-४०० या एअर डिफेन्स सिस्टमच्या तीन स्वाड्रन ऑपरेशनल झाल्या आहेत. अजून दोन सिस्टम येणाऱ्या काळात भारताच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. एस-३५० ही मध्यम आणि इनर लेअर डिफेन्ससाठी आदर्श मानली जात आहे.

S-350 Vityaz ही (एक्सपोर्ट व्हर्जन एस - ३५० ई) रशियाचे अत्याधुनिक मध्यम रेंजचे सर्फेस टू एअर मिसाईल स्टिस्टम आहे. ही सिस्टम अल्माज - एंटे यांच्याद्वारे तयार केली आहे. ही जुन्या एस - ३०० पीएस सिस्टमला रिप्लेस करण्यासाठी डिझाईन करण्यात आली आहे.

**रेंज :** एरोडायनॅमिक टार्गेट्ससाठी विशेष करून फायटर जेट्ससाठी याची रेंज १२० किलोमीटरपर्यंत आहे. तर बॅलेस्टिक मिसाईलसाठी याची रेंज २५ ते ३० किलोमीटर आहे.

**उंची :** ही एअर डिफेन्स सिस्टम २० ते ३० किलोमीटर अंतरावरची टार्गेट्स इंटरसेप्ट करू शकतात.

मिसाईल: यात प्रामुख्याने ॲक्टिव्ह रडार गायडेड 9M96E आणि 9M96E2 मिसाईल, त्याच्या जोडीला शॉर्ट रेंजचे 9M100 च्या मिसाईलचा समावेश आहे. एका लाँचरमध्ये १२ मिसाईल लोड करता येतात.

**टार्गेट क्षमता :** एकावेळी ही एअर डिफेन्स सिस्टम विमान अन् हेलिकॉप्टर सारखी १६ टार्गेट्स तर १२ बॅलेस्टिक मिसाईल टार्गेट्स ट्रॅक करून त्यावर अटॅक करू शकते.

# पशुपक्ष्यांच्या भावना समजणारी भूमी जीवदया संवर्धन संस्था

आजकाल 'मेवा तिथे सेवा' हे ब्रीद घेऊन समाजसेवकाचा मुखवटा लावलेल्या कितीतरी संस्था आणि व्यक्ती पैशाला पासरी आहेत. उद्देश एकतर लोकसहभागातून कोणती ना कोणती विचारधारा लोकांच्या मनावर लादण्यासाठी तसेच या माध्यमातून सर्व प्रकारचे दान उकळणे असाच काहीसा असतो, पण मग भूमी जीवदया संवर्धन संस्थेच्या या पशुपक्षी प्रेमाचा, सेवेचा उद्देश काय? यावर भूमी जीवदया संवर्धन संस्थेचे ट्रस्टी सागर सालवा म्हणाले की, "माणसाचं काय हो? विनोद झाला तर त्यांना हसता येतं, दुखलं तर रडून सांगता येतं पण, प्राण्यांनी आणि पक्ष्यांनी काय करावं? कोणाशी बोलावं? तुम्ही ऐकलंय त्यांचं बोलणं ! नाही ना ! पण प्राणी बोलतात...पण त्यांचं निःशब्द बोलणं ऐकण्यासाठी मनाची भाषा कळावी लागते आणि त्याहून आधी त्यांना समजून घ्यावं लागतं. स्वार्थाच्या पलीकडे जाऊन एक करुणेची, दयेची संवेदना आहे. त्या संवेदनेचा उद्देश घेऊन भूमी जीवदया संवर्धन संस्था काम करते. तसं पाहिलं तर सागर यांना



राघवजीभाई पटेल, संस्थेचे संस्थापक

**लोकसेवार्थ**

प्राण्यांची अगदी लहानपणापासून आवड आणि राहायला ते मुलुंडला. मग त्या वेळी म्हणजे दहा वर्षांपूर्वी रेस्क्यू माध्यमातून त्यांनी त्यांच्या या कार्याची सुरुवात मुलुंडमधील 'बेन्नास' या संस्थेसोबत सुरू केली. त्यानंतर गोवंडीमधील 'आय. डी.ए.' या संस्थेमध्ये त्यांनी दोन वर्ष सेवा केली आणि या वेळात प्राण्यांविषयीचं दाट प्रेम अगदी त्यांच्या रक्तात भिनायला सुरुवात झाली आणि त्यांचं हे प्रेम अमर करायची संधी त्यांचे गुरू राघवजी पटेल यांनी २०१४ साली मिळवून दिली २७ जुलै, २०१४ या दिवशी भूमी जीवदया संवर्धन संस्थेची निर्मिती झाली. हे स्वप्न म्हणजे राघवजी आणि सागर या दोघांची इच्छापूर्ती.

ते म्हणाले, "संस्थेचा मूळ उद्देश प्राणीमात्रांचे रक्षण कार्य, पण मला लोकांची मानसिकता बदलायची आहे, कारण अजूनही माणसं प्राण्यांना किंवा पक्ष्यांना, माणसांच्या नजरेने मुळात बघतच नाहीत, त्यांच्या वेदना समजून घ्यायचा प्रयत्न करत नाहीत. ज्या दिवशी प्रत्येकाचा यांच्याकडे

**लोकजागर**

बघायचा दृष्टिकोन बदलेल, त्या दिवशी चित्रच काही वेगळं असेल. मग बऱ्याच साऱ्या माध्यमांतून आम्ही लोकांमध्ये जनजागृती करायचा प्रयत्न करतो."

हे सर्व उपक्रम पाहिले की वाटते, पशुपक्ष्यांच्या सेवेचा सर्वतोपरी विचार करून संस्था कार्यरत आहे. संस्थेच्या कार्यालयाची धारणाशक्ती ही पाचशे पक्ष्यांची असून, संस्थेत चाळीस कुत्रे राहू शकतात. सध्या इथे दीडशे पक्षी असून पंचवीस कुत्र्यांवर उपचार चालू आहेत. दिवसातून सरासरी आठ फोन प्राण्यांच्या बचावासाठी यांच्याकडे येतात. मग मी कुतूहलाने विचारलं, जर मोठ्या प्राण्यांसाठी म्हणजेच एखाद्या जखमी गायीसाठी फोन आला तर तुम्ही त्यांना कुठे ठेवता? यावर त्यांनी सांगितले, "मोठ्या घायाळ प्राण्यांना म्हणजेच गाय, गाढवं,घोडा यांना ते कर्नाळा येथील 'हॅन्ड्स दॅट हिल' या संस्थेत दाखल करून त्यांच्यावर उपचार तिथेच केले जातात."

.काही गोष्टी आपले संस्कृती, संस्कार शिकवतात आणि यातली महत्त्वाची शिकवण म्हणजे प्राणीमात्रांवर दया. इतकंच सांगेन, जगा आणि जगू दया...मग हे जग सुंदर आहेच. आपल्या मुलांना प्राण्यांविषयी विशेष लळा लहानपणापासून लावा. कोणत्याही संस्थेत जाऊन तिथल्या प्राण्यांना खाऊ घाला. बघा, किती बरं वाटेल.जास्त नाही हो, याला दोन ते तीन हजार खर्च येईल पण त्या मुक्या जिवांना थोडं का होईना, तुम्हांला समजून घेता येईल."

# युवकांना रोजगार संधीसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म !

रत्नागिरीमध्ये अनेक प्रकारच्या सेवा लोकांना सहज उपलब्ध होत नाहीत. तरुणांकडे कौशल्य आहे; पण त्यांना संधी मिळत नाही. त्यांचे कौशल्य सर्व रत्नागिरीवासियांना एकाच ठिकाणी कळले, तर त्यातून सहज रोजगार संधी मिळू शकतात. या अनुषंगाने मागील २ वर्षे अभ्यास करून 'अनबॉक्स सर्व्हिसेस' हा डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध केला आहे. १ मे या दिवशी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या मुहूर्तावर याचा प्रारंभ झाला आहे, अशी माहिती युवा उद्योजक श्री. गौरांग आगाशे यांनी दिली. 'अनबॉक्स युअर डिझायर ॲप'द्वारे गेली ५ वर्षे रत्नागिरीमध्ये खाद्यपदार्थ वितरण, किराणा माल, औषधे, प्लास्टिक आणि ई-वेस्ट गोळा करण्यात येते. या माध्यमातून ५० तरुणांना रोजगार उपलब्ध झाला; परंतु अनेक प्रकारच्या सेवा एकाच मंचावर उपलब्ध नसल्याने तरुणांना रोजगारासाठी रत्नागिरी सोडून बाहेरगावी जावे लागते.कौशल्य विकास अभ्यासक्रम, आयटीआय, शासकीय तंत्रनिकेतन यामधून कौशल्यवान होणाऱ्या विद्यार्थ्यांना कौशल्याधारित रोजगाराची आवश्यकता आहे. त्याकरता डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला आहे.



या प्लॅटफॉर्मद्वारे खात्रीशीर आणि वेळेमध्ये सेवा मिळू शकतात. याकरता २ वर्षे सर्वेक्षण तसेच अनेक व्यक्तींना भेटून समस्या काय ? आणि त्यावरील उपाय काय ? असा अभ्यास करण्यात आला.

**शून्यातून विश्व**

अगदी रिक्शावालासुद्धा यात सहभागी होऊ शकतो.

अनबॉक्सने आतापर्यंत स्थानिकांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच 'अनबॉक्स सर्व्हिसेस-प्रोव्हायडिंग सोल्युशन्स' हे ॲपसुद्धा स्थानिक आयटी कंपनी आर्यक सोल्युशनचे प्रशांत आचार्य आणि ऋषिकेश सरपोतदार यांनी साकारले आहे.पूर्वी 'यलो पेजेस' टेलिफोन सूची असायची. त्यामध्ये सर्व व्यावसायिक आवश्यक संपर्क नंबर असायचे. काळाच्या ओघात हे सर्व मागे पडले. आजकाल एखादा नंबर लगेच मिळत नाही. ही आवश्यकता लक्षात घेऊन समाजाचेही आपण काही देणं लागतो, या भावनेने 'अनबॉक्स साथी' हा विभाग तेथे असेल. त्यात महत्त्वाचे नंबर्स विनामूल्य देणार आहोत. अनबॉक्स साथी'च्या माध्यमातून वाशिंग मशीन आणि एसी दुरुस्ती,इलेकटीश्न,प्लंबर, फर्निचर,पौराहित्य,होम क्लीनिग,ड्रायवर,गाडी भाड्याने मिळणे,फाब्रीकेषण,वादक,इव्हेंटमनेजर,फोटोग्राफर्स,लायटिंग आदी सेवा देखील या माध्यमातून दिल्या जाणार आहेत. प्रवासी सेवा,वास्तुविक्री,कुरिअरआणि खानपान सेवा अशा सेवा त्वरित उपलब्ध करून देणारा हा उपक्रम खरोखरच गौरांगणे तरुणांना नवीन व्यावसायिक संधीसाठीच निर्माण केला आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे ८ जणांचा मृत्यू

इंदूर, दि. ३१ वृत्तसंस्था

देशातील सर्वात स्वच्छ शहरांपैकी एक असलेल्या इंदूरमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. गेल्या काही दिवसांपासून दूषित पाण्याच्या पुरवठ्यामुळे आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर या दूषित पाण्यामुळे १००० हून अधिक लोकांना पोटदुखी आणि उलट्या-जुलाबांचा त्रास होत आहे. इंदूर शहरामध्ये नर्मदा नदीमधून येणारं पाणी हे आजार आणि मृत्यूचं कारण ठरत असल्याचं समोर आलं आहे. आता खबरदारीचा उपाय म्हणून महानगरपालिकेने प्रभावित भागातील पाणीपुरवठा बंद केला आहे. तसेच जलवाहिनीची दुरुस्ती केली जात असून, टँकरमधून स्वच्छ पाणी पुरवलं जात आहे. तसेच आरोग्य विभागाची पथके घरोघरी जाऊन रुग्णांची तपासणी करत आहे.

दूषित पाणीपुरवठ्यामुळे ही घटना घडल्याचे निदर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेने त्वरित तपास सुरू केला. त्यानंतर भागिरथपुरा पोलीस



चौकीच्या टॉयलेटखालून जाणाऱ्या नर्मदेच्या जलवाहिनीला गळती लागली होती. तसेच या गळतीमुळे दूषित पाणी जलवाहिनीमध्ये मिसळत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संपूर्ण प्रभागात दूषित पाण्याचा पुरवठा होत होता. तसेच हे दूषित पाणी पिऊन लोक आजारी पडत होते.

दरम्यान, दूषित पाण्याचे प्राशन केल्याने तब्येत बिघडून आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याने इंदूरमधील भागिरथपूरामध्ये खळबळ उडाली आहे. या भागातून सातत्याने नवनवे रुग्ण समोर येत आहेत. तसेच अत्यवस्थ असलेल्या रुग्णांना प्राथमिक उपचार करून पुढील उपचारांसाठी मोठ्या रुग्णालयात पाठवले जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून नर्मदा नदीच्या पाण्याचा वापर करू नका, असं आवाहन करणाऱ्या पोस्ट येथील सोशल मीडियावरून लोक शेअर करत होते. मात्र लोकांच्या तक्रारींकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने दुर्लक्ष केले. या दूषित पाण्यामुळे आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला आहे. मात्र अधिकृत आकडा ३ असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दूषित पाण्यामुळे नेमका किती जणांचा मृत्यू झाला, याबाबच संशय व्यक्त केला जात आहे. दुषित पाण्यामुळे आतापर्यंत ११०० हून अधिक लोकांना उलट्या-जुलाब, पोटदुखीचा त्रास होत आहे. तर १११ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# हिंदू तरुणांनी टिकून राहण्यासाठी आयसिससारखी संघटना स्थापन करावी
## यति नरसिंहानंद गिरी यांचे वादग्रस्त विधान

गाझियाबाद, दि. ३१ वृत्तसंस्था

शिवशक्ती धाम दासना आणि श्री पंचदशनम जुना आखाड्याचे महामंडलेश्वर यांचे मुख्य पुजारी यती नरसिंहानंद गिरी यांनी एक व्हिडिओ जारी केला आहे. ज्यामध्ये त्यांनी हिंदू रक्षा दलाच्या अध्यक्षा पिंकी चौधरी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी तलवारी वाटल्याचे समर्थन केले. हे समर्थन करताना त्यांनी,"अशी शस्त्रे वाटली गेली पाहिजेत जी इस्लामिक जिहादींपेक्षा चांगली होती."असे म्हटले आहे. तसेच इस्लामिक जिहादींना अधिक योग्य असलेली शस्त्रे वाटली पाहिजेत असे म्हणत त्यांनी वादग्रस्त विधान केले आहे.

यती नरसिंहानंद यांनी बांगलादेशातील निष्पाप हिंदूंच्या हत्याकांडाचे कारण हिंदू समुदायातील व्यापक नैराश्याला दिले आहे. याविषयी बोलताना त्यांनी, सोशल मीडियाद्वारे उघड झालेल्या बांगलादेशातील हिंदूंच्या क्रूर हत्याकांडांनी संपूर्ण हिंदू समुदायाला भयभीत आणि निराश केले आहे," असे त्यांनी म्हटले आहे.

बांगलादेशात आणि त्यापूर्वी पाकिस्तान आणि अफगाणिस्तानात अशा प्रकारे लाखो निष्पाप हिंदूंची हत्या करण्यात आली आहे. या घटनांविरुद्ध जगभरात कोणताही ठोस निषेध झालेला नाही. भारतात अशा घटना घडू नयेत या चिंतेतून, पिंकी चौधरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हिंदू समुदायात तलवारी वाटल्या आहेत.

# गोवंश तस्करांच्या टोळी विरुद्ध मोका
## राज्यात पहिली कारवाई

नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी

गोवंश तसेच गोमांसाची वाहतूक करणाऱ्या १२ जणांच्या तस्करांच्या टोळीवर नागपूर ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) कारवाई केल्याने गोवंश तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. राज्यात या प्रकारची ही पहिलीच कारवाई आहे.

महाराष्ट्रात गोवंश तसेच गोमांसाची वाहतूक करताना आढळल्यास संबंधितावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) लावण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती.

नागपूर ग्रामीणमध्ये कळमेश्वर पोलिस ठाण्यात १६ नोव्हेंबर २०२५ रोजी डायल ११२ वर फेटरी येथे नागपूर ते काटोल रोडवर एका ट्रकला आग लागल्याची माहिती मिळाली. कळमेश्वर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता एक ट्रक जळतांना दिसला तर चालक पसार होता. पोलिसांनी अग्निशमन दलास बोलावून ही आग विझविली. वाहनाची तपासणी केली असता आत गोवंश होते. त्यांना दोरखंडाने बांधून निर्दयतेने आत कोंबलेले होते. ३७ पैकी २९ जनावरे आगीत होरपळून मृत्यूमुखी पडली. बचावलेल्या ८ गोवंशाला राउळगाव येथील जैन गोशाळेत दाखल करण्यात आले.

तपासात हा गुन्हा संघटितरित्या केल्याचे स्पष्ट झाले. आरोपी टोळी प्रमुख मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी, वाहन चालक सैयद सुल्तान उर्फ सोनू हमीद अली, आमीर रउफ कुरेशी, रफीक कुरेशी शेख सत्तार कुरेशी, जनावरे खरेदी-विक्री करून वाहतूक करणारा वाहन चालक-मालक शोहेब नौशाद सैयद, मनोहर भोजराज मनगटे, इख्तियार कुरेशी मुश्ताक कुरेशी याच्यासह पाच फरार आरोपींविरूद्ध मोक्का लावण्यात आला आहे. जनावर वाहतुकीसाठी टोळी प्रमुख मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी याच्याकडे ट्रक आहे.

# भारत-पाकिस्तान संघर्षामध्ये मध्यस्थी केल्याचा चीनचा दावा

नवी दिल्ली, दि. ३१ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उध्वस्त केले होते. यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष पेटला होता. हा संघर्ष संपवण्यात मध्यस्थी केल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. मात्र भारताने हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला. दरम्यान यानंतर आता चीनने देखील आपण भारत आणि पाकिस्तान यांच्यात या संघर्षाच्या काळात मध्यस्थी केल्याचा दावा केला आहे. भारताने चीनचा दावा देखील पूर्णपणे फेटाळून लावला असून शस्त्रविरामाच्या निर्णयामध्ये कोणत्याही तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप नव्हता, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

ऑपरेशन सिंदूर नंतर १० मे रोजी दोन्ही देशांच्या डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेश्न्स (DGMO) मध्ये थेट चर्चा झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रविराम जाहीर करण्यात आला, असे भारताकडून वारंवार सांगण्यात आले आहे.

"आम्ही यापूर्वीच असे दावे फेटाळले आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय मुद्द्यावर तिसऱ्या पक्षाची कसलीही भूमिका नाही. दोन देशांच्या डीजीएमओमध्ये झालेल्या थेट चर्चेनंतर शस्त्रविरामावर एकमत झाले, ही आपली भूमिका यापूर्वीही अनेकदा स्पष्ट करण्यात आलेली आहे," असे सूत्रांनी सांगितले.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002. **Group Editor-in-Chief and Director - Shrikrishna Tansukhdas Chandak**, Group Editor - **Sandeep Ramrao Kale**, Managing Editor - **Pankaj Shrikrishna Chandak**, **Resident Editor- Jayant Mahajan.** **PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **समूह मुख्य संपादक व संचालक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३), समूह संपादक - संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक - पंकज श्रीकृष्ण चांडक निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**